नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



॥ परमात्मा एक ॥
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. १३, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४



* वर्ष ५२ * अंक ४७ * * अकोला * सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

खरीखरी..

## पदयात्रेची मात्रा

आज बिहारमध्ये तेथील सत्तारूढ पक्षाच्या विरोधात अनेक पक्षांना सोबत घेऊन राहुल गांधी यांनी तेजस्वी रणशिंग फुंकले. जे शब्द राहुल गांधींनी वापरले आहेत ते शब्द न्यायालयाला म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाला पसंत नाहीत आणि निवडणूक आयोगाला तर विरोधीच वाटतात. विरोधी पक्ष म्हणून आजच्या सत्तारूढ पक्षाने आधुनिक गांधीबाबांना पुढे करून जे जे महा आरोप केले होते. त्या सर्व आरोपांचे या अकरा वर्षात अक्षरशः बारा वाजलेले आहेत म्हणजेच हे ईडीसारखे झाले ईडी एखाद्यावर आरोप करते, त्याला तुरुंगात टाकते पण त्या विरुद्धच्या खटला खाटल्यावरच संपतो. आता राहुल गांधी यांनी जे आरोप केलेले आहेत ते खरे नसतील असे आम्ही म्हणून टाकतो. मग खरे काय आहे हा प्रश्न आहे. निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षावर आरोप न करता त्याबद्दल सांगितले पाहिजे. निवडणूक आयोगाचे काम राजकीय निवेदने करण्याचे नाही पण सध्या सर्वच जण आपल्या संवैधानिक आणि राजकीय मयार्दा विसरले दिसत आहेत की काय असा संशय येण्यास जागा आहे. राहुल गांधी सध्या भलतेच जोशात आहेत ते पूर्वीच्या विरोधी पक्ष नेत्याप्रमाणे नाहीत. याचे कारण असे असावे की आताचे सरकार पूर्वीच्या सरकार सारखे नाही कारण १९४७ पासून चा जर इतिहास बघितला तर विरोधी पक्षातील अनेक दिग्गज नेते काँग्रेसच्या प्रचंड बहुमतासमोर कधीही झुकले नाहीत. पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे अत्यंत लोकप्रिय नेते पंतप्रधान पदावर होते त्यांची जादू सुद्धा १९६२ साली झालेल्या चिनी आक्रमणा नंतर कमी झालेली होती. तेव्हा आपला पराभव होत आहे असे दिसत असतानाही नेहरूंनी लोकसभेचे अधिवेशन बोलावले, सर्व आरोपांना उत्तरे दिली. त्यानंतर जी जी युद्ध झाली ती फक्त पाकिस्तान विरुद्ध होती विशेष म्हणजे सर्व युद्धामध्ये आपण या पाकड्यांना चारी मुंड्या चीत केलेले आहे. नुकत्याच संपलेल्या ऑपरेशन सिंदूर मध्येही आपण पाकिस्तानला दाबूनच टाकले. एवढा पराक्रम गाजवून आपल्या सैन्याने देशाची मान उंचवली त्याबद्दल देशाला विश्वासात घेतले असते तर अधिक बरे झाले असते. युद्धाच्या दिवसात विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षांनीही सरकारला बिनशर्त पाठिंबा दिला होता. १९७१ साली अटल बिहारी वाजपेयी यांनी सुद्धा सरकारला पूर्ण पाठिंबा दर्शविला होता एकूणच काय जर परस्पर सामंजस्य असले, तर विरोधी पक्षाच्या मनातील विखार कमी होऊ शकतो. विरोधाला विरोधाने तोंड देण्याऐवजी सरकारने संयमाने उत्तरे दिली असती तर कितीतरी प्रश्न आपोआपच सुटले असते. आता राहुल गांधी यांच्या मतचोरी बद्दलच्या ताज्या वक्तव्यांचा किंवा आरोपांचा जबाब निवडणूक आयोगाने द्यायला पाहिजे होता. त्याऐवजी निवडणूक आयोगाचे अघोषित प्रवक्ते बनून विरोधी पक्षांच्या आरोपाचे उत्तर देण्याची इतरांना काहीच गरज नव्हती. निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन जे निवेदन दिले त्यामध्ये विरोधी पक्षांच्या आरोपांचे उत्तर नाही, उत्तर नाही म्हणजे विरोधी पक्षांनी उपस्थित केलेले आरोप एक तर खरे नसावेत किंवा ते दुर्लक्षित करण्याजोगे असावेत. मात्र दुर्लक्ष करण्याजोगे असते तर आज बिहार मधील मत अधिकार यात्रेला हजारो लोक उपस्थित होते. ही परिस्थिती का निर्माण झाली हा विचार सर्वसामान्यांच्या मनात सहज येऊ शकतो. अशा परिस्थितीमध्ये निवडणूक आयोगाबद्दल शंका कुशंका निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे असे बरेच लोकांना वाटते. जो निवडणूक आयोग वगळलेल्या मतदारांची नावे देण्यास ठाम नकार देत होता त्या निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने ४८ तासांच्या आत सर्व नावे जाहीर करण्याचा आदेश दिला. हा आदेश देण्यापूर्वी निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा संधी दिली होती पण आयोग स्वतःच्या भूमिकेवरती ठाम होता. आपण स्वायत्त आहोत आणि काहीही करू शकतो अशा अविभार्वात होता आज बहुतेक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याचा शेवटचा दिवस होता. आयोगाने काय केले हे आम्हाला ठाऊक नाही पण आयोगाच्या अनेक प्रयोगांपैकी बिहारचा प्रयोग वादात अडकलेला आहे. या वादावादी पेक्षा विचारलेल्या खऱ्या खोट्या प्रश्नांची उत्तरे दिली असती तर सर्वोच्च न्यायालयासमोर शुक्रवारी झालेली निवडणूक आयोगाची नाचक्की नक्कीच टाळता आली असती. आता पदयात्रा सुरू झाली आहे त्यातून कोणती मात्रा निघेल हे कोणालाच ठाऊक नाही. मात्र निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांना समाधानकारक उत्तरे द्यावीत एवढीच विरोधी पक्षांची मागणी आहे. तेवढे झाले तरी तो आपल्या देशातील लोकशाहीला बळकट ठरणारा बळकट करणारा प्रयोग ठरेल.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# अंतराळवीर शुभांशू पोहोचले दिल्लीत

## पंतप्रधानांना भेटणार, मंत्री जितेंद्र सिंह यांनी केले स्वागत

■ वृत्तसंस्था, लखनऊ, दि. १७

लखनऊचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला अमेरिकेहून भारतात परतले आहेत. ते रविवारी सकाळी त्यांची पत्नी कामना आणि मुलगा किआशसह दिल्ली विमानतळावर उतरले. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी त्यांचे स्वागत केले. शुभांशू यांचे वडील शंभू दयाळ शुक्ला देखील त्यांच्यासोबत होते.



शुभांशू आज पंतप्रधान मोदींना भेटू शकतात. त्यानंतर ते बंगळुरूला जातील. २३ ऑगस्ट रोजी ते इस्रोच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ दिनाच्या समारंभात सहभागी होतील. २५ ऑगस्ट रोजी ते लखनऊला घरी येऊ शकतात. शुभांशू यांच्या आईने सांगितले की - तो जगासाठी एक सेलिब्रिटी असू शकतो, पण माझ्यासाठी तो अजूनही माझा लहान मुलगा आहे. मी त्याच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहे.

शुभांशू १६ ऑगस्ट रोजी टेक्सासमधील जॉर्ज बुश इंटरकॉन्टिनेंटल विमानतळ येथून भारतासाठी उड्डाण केले. त्यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट करून माहिती दिली. लिहिले - यूं ही चला चल राही... जीवन गाड़ी है, समय पहिया। मी माझ्या देशात पोहोचण्यास उत्सुक आहे.

ॲक्सियम मिशन-४ अंतर्गत, शुभांशू शुक्लासह चार अंतराळवीर २५ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकासाठी रवाना झाले. ते २६ जून रोजी भारतीय वेळेनुसार ४:०१ वाजता आयएसएसवर पोहोचले. १८ दिवस राहिल्यानंतर, ते १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतले. कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर लँडिंग करण्यात आले. १८ दिवस अंतराळ स्थानकात राहिल्यानंतर शुभांशू शुक्ला १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतले. १८ दिवस अंतराळ स्थानकात राहिल्यानंतर शुभांशू शुक्ला १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतले.

ज्याप्रमाणे एक आई आपल्या मुलाचे स्वागत करते, त्याचप्रमाणे आपण त्याचे स्वागत करू. प्रत्येकजण त्याचे स्वागत करण्यास उत्सुक आहे. हा एक अभिमानाचा क्षण आहे. संपूर्ण देशासाठी हा एक अद्भुत क्षण आहे. अशा परिस्थितीत, प्रत्येकजण त्याला भेटू इच्छितो. आता माझ्याशिवाय, तो संपूर्ण देशाचा मुलगा झाला आहे. म्हणूनच प्रत्येकजण त्याचे स्वागत करू इच्छितो.

### १५ जुलै रोजी अंतराळातून परतले

शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर २५ जून रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी १२ वाजता ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत आयएसएसकडे रवाना झाले. ते २६ जून रोजी दुपारी ४:०१ वाजता आयएसएसला पोहोचले. त्यांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण केले. १८ दिवस तिथे राहिल्यानंतर ते पृथ्वीवर परतले. सुमारे २३ तासांच्या प्रवासानंतर, ड्रॅगन अंतराळयान १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर उतरले.

### पुरात अडकलेल्या गर्भवती महिलेचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, लखनऊ, दि. १७

हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. मुंबई शहराव्यतिरिक्त, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोकण आणि गोवा येथे अचानक पूर येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशातील फारुखाबाद येथे रुग्णालयात जाणाऱ्या एका गर्भवती महिलेचा बोटीवरच मृत्यू झाला. माडिया गाव पुराच्या पाण्याने वेढलेले आहे. अशा परिस्थितीत, प्रसूती वेदना सुरू होताच कुटुंबाने आशा वर्करला बोटीतून बोलावले.

आशा वर्करने तपासणीनंतर तिला रुग्णालयात नेण्यास सांगितले. पती आणि आशा वर्कर जमुना यांना नावेत ठेवून रुग्णालयात घेऊन जात होते, परंतु वाटेतच महिलेचा मृत्यू झाला. मध्य प्रदेशातही पूरस्थिती आहे. बडवानीच्या राजपूरमध्ये नद्या आणि नाले तुडूंब भरून वाहत आहेत. येथील नगर पालिका उपाध्यक्षांची गाडी नदीत वाहून गेली. राज्यात ९३९.८ मिमी पाऊस पडतो. आतापर्यंत ७८७.४ मिमी पाऊस पडला आहे.

## कार व एसयूव्हीची जोरदार धडक ७ जणांचा जळून मृत्यू

■ वृत्तसंस्था, गांधीनगर, दि. १७

गुजरातमधील सुरेंद्रनगर जिल्ह्यात रविवारी झालेल्या कार अपघातात किमान सात जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्यांनी पीटीआयशी बोलताना दिली. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, रविवारी एका स्विफ्ट डिझायर कारची टाटा हॅरियर रवश कारची समोरासमोर जोरदार टक्कर झाल्यानंतर हा अपघात झाला. पोलिस अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, अपघातानंतर स्थानिक लोक, पोलीस आणि १०८ पथकाने बचावकार्यासाठी घटनास्थळी धाव घेतली.

दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास देदादरा गावाजवळ घडलेल्या या घटनेत कारमधील सात जण जिवंत जळाले तर एसयूव्हीमधील तिघे जण किरकोळ जखमी होऊन बचावले, असे वाढवन पोलिस ठाण्याचे निरीक्षक पीबी जडेजा यांनी सांगितले. दुपारी साडेतीनच्या सुमारास देदादरा गावाजवळ घडलेल्या या दुर्घटनेत कारमधील ७ जण जिवंत जळाले तर एसयूव्हीमधील तिके किरकोळ जखमांसह बचावले, अशी माहिती वाधवन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पी. बी. जडेजा यांनी सांगितले. या दुर्घटनेनंतर रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.



### हिट ॲन्ड रन मध्ये वृद्धाचा मृत्यू

नागपूर : हिट ॲन्ड रनमध्ये पुन्हा एकाला जीव गमवावा लागला. एका महिलेने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत एका वृद्धाला जबर धडक दिली आणि पळून गेली. यात गंभीर जखमी वृद्धाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. महेश बिसाहू वर्मा (६०) रा. समाज एकता सोसायटी, न्यू मनिषनगर, बेलतरोडी असे मृताचे नाव आहे.

वर्मा कुटुंबाचा दुधाचा व्यवसाय असून त्यांच्याकडे अनेक गायी आहेत. शनिवारी त्यांनी गायींना चरण्यासाठी मोकाट सोडले होते. मात्र रात्री उशिरापर्यंतही जनावरे घरी न परतल्याने त्यांना चिंता झाली. रात्री ८.३० वाजताच्या सुमारास महेश जनावरांना शोधण्यासाठी घरून निघाले. सोमवारी बाजाराकडून जीजामाता चौकाकडे जाणाऱ्या सीमेंट रस्त्याने पायदळ जात होते.

## ऑप्टिकल फायबरच्या कामादरम्यान तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७

बीएसएनएलच्या इन्स्पेक्शन चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरचे काम करताना गुदमरून तीन कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना दुपारी निगडी प्राधिकरण सेक्टर क्रमांक २७, प्लॉट क्रमांक ६५ समोर रस्त्याच्या कडेला असलेल्या बीएसएनएलच्या चेंबरमध्ये घडली. दरम्यान यांच्यासोबत असलेला चौथा कामगार बालंबाल बचावला.

दत्ता होलारे, लखन धावरे (दोघेही रा. गुरुद्वारा चौक, आकुर्डी) आणि साहेबराव गिरसेप (रा. बिजलीनगर) अशी मृत कामगारांची नावे आहेत. हे कामगार मूळचे धाराशिवचे राहणारे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बीएसएनएल आकुर्डी कार्यालयातील तीन कंत्राटी कामगार नेहमीप्रमाणे रोजच्या कामावर गेले होते. चेंबरमधील कामानिमित्ताने ड्रेनेज मध्ये रावसाहेब सर्वात प्रथम उतरले. काही कळण्याआधीच मोठा आवाज झाला आणि ड्रेनज मध्ये साचलेल्या अतिशय दुर्गंधीयुक्त पाण्यात ते कोसळले. लखनने हे पाहिले तसा तोही खाली उतरला. रावसाहेबाला उचलण्यासाठी खाली वाकला आणि तोही कोसळला. हे पाहणाऱ्या दत्ताने एका क्षणाचाही वेळ न लावता ड्रेनज मध्ये उडी घेतली आणि तोही डोळे पांढरे करून आडवा झाला.

यांच्यासोबत आलेला चौथा कामगार चेंबर बाहेर उभा होता. ड्रेनेजमध्ये गॅस असल्याचे त्याच्या लक्षात आले. खाली उतरलेल्या तिघांना वाचवण्यासाठी त्यांनी आरडाओरडा सुरू केला. मात्र तोपर्यंत गुदमरून तिघांचाही मृत्यू झालेला होता अशी माहिती निगडी पोलिसांनी दिली. घटनेनंतर परिसरात क्षणात खळबळ उडाली. स्थानिकांनी कामगारांना बाहेर काढण्यासाठी जीव तोडून प्रयत्न केले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

दरम्यान तिघांच्या कुटुंबीयांना सायंकाळपर्यंत या घटनेची माहिती मिळालेली नव्हती. पोस्टमार्टम करण्यासाठी वाय सी एम रुग्णालयात मृतदेह आणण्यात आले. त्यावेळी तिघांचे कुटुंबीय तेथे आल्यानंतर एकच आक्रोश पाहायला मिळाला.

## श्रीमंत राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीचे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत दाखल होणार असून महाराष्ट्र शासनातर्फे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जोरदार स्वागत होणार आहे. तर संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण सोहळा पार पडेल.

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र शासनाने लिलावात जिंकली असून नुकतीच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी लंडन येथे ही तलवार ताब्यात घेतली असून उद्या १८ ऑगस्टला ती मुंबईत दाखल होईल.

त्यानंतर विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन बाईक रॅली काढून, चित्ररथावर विराजमान करुन ही तलवार पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीकडे नेण्यात येईल.

दरम्यान, संध्याकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्य विभाग,पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी तर्फे "सेना साहेब सुभा पराक्रम दर्शन" सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात श्रीमंत राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवार प्रदर्शनाचे उदघाटन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होईल.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान तथा मुंबई उपनगर पालक मंत्री ॲड. आशिष शेलार, श्रीमंत राजे रघूजी भोसले यांचे वंशज श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांच्यासह खासदार अनिल देसाई, आमदार महेश सावंत, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत.

## जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा ढगफुटी

### कठुआमध्ये सात जणांचा मृत्यू, अनेक जखमी

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. १७

जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काही दिवसांपूर्वीच ढगफुटीची घटना घडली होती, ज्यामध्ये सुमारे ६५ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आथा पुन्हा एकदा कठुआ जिल्ह्यातील एका दुर्गम गावात शनिवार आणि रविवारच्या रात्री ढगफुटीची घटना घडली आहे. या दुर्घटनेत किमान ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी पीटीआयशी बोलताना दिली.




राजबागच्या जोड घाटी गावात ढगफुटीची घटना घडली. यामुळे गावाचा संपर्क तुटला असून काही मलमत्ता आणि जमिनीचे नुकसान झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितलले. पोली आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांची संयुक्त पथके घटनास्थळी दाखल झाली असून स्थानिकांच्या मदतीने रविवारी सकाळी बचावकार्य सुरू होते. आत्तापर्यंत चार नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर सहा जखमी लोकांना बाहेर काढून त्यांना रुग्णलयात दाखल केले जात आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी पीटीआयशी बोलताना दिली. जिल्ह्यात झालेली ढगफुटी आणि भुस्खलन यानंतर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी प्रशासनाला बचाव आणि मदतकार्य करण्याचे आणि नागरिकांची सुरक्षितता निश्चित करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच त्यांनी पीडित कुटुंबांबद्दल संवेदना व्यक्त केल्या आहेत आणि जखमी नागरिक लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना केली आहे.

## रोजगार निर्मितीसाठी आयटी पार्क उभारण्यात येईल : मुख्यमंत्री

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १७

सोलापूरमध्ये आयटी पार्क उभे केल्यास युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. जिल्हा प्रशासनाने उत्तम जागा शोधल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आयटी पार्क उभारण्यात येईल आणि इथे आयटी उद्योग आणण्यात येतील. शहरात उद्योगासाठी आवश्यक चांगले रस्ते आणि विमानसेवा उपलब्ध झाल्याने इथल्या औद्योगिक विकासावर भर देण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)अंतर्गत म्हाडातर्फे उभारण्यात आलेल्या दहिटणे येथील राष्ट्र तेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत १ हजार १२८ आणि शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत २२० अशा एकूण १ हजार ३४८ सदनिकांच्या वितरण प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला पालकमंत्री जयकुमार गोरे, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, रणजितसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, दिलीप सोपल, सचिन कल्याणशेट्टी, अभिजित पाटील, देवेंद्र कोठे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर आदी उपस्थित होते.

सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलपूरमध्ये बंद जलवाहिनीने पाणी आणण्यात येणार आहे. सांडपाणी प्रकल्पाच्या जागेचा प्रश्न दूर करण्यात आला असून ते कामही सुरू करण्यात आले आहे. शहरातील जल वितरण वाहिनीच्या ८५० कोटीच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. सोलापूर शहरातील नागरिकांना दररोज शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे असे प्रयत्न करण्यात येत आहेत. विमानतळाचे अतिरिक्त कामही लवकरच करण्यात येणार आहे.

देशाला नवीन दिशा देणारे आणि नवभारताचा पाया रचणारे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मरणार्थ प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राष्ट्रतेज अटल गृहनिर्माण संस्थेने सुंदर गृहनिर्माण प्रकल्प साकारला असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत अतिशय सुंदर घरांची निर्मिती करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या समस्या दूर करतांना सामान्य माणसाला हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आली. त्याअंतर्गत पीपीपीच्या माध्यमातून काही प्रकल्प हाती घेण्यात आले, त्यातील हा प्रकल्प आहे.

ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३० लाख घरकुलांना केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे २०१८ पर्यंत प्रतिक्षा यादीतील सर्व नागरिकांना घरे देण्यात येणार आहे. देशात सर्वाधिक वेगाने घरे ग्रामविकास विभागामार्फत उभारण्यात येत आहेत. २० लाखापेक्षा अधिक घरांचे काम सुरू करण्यात आले आहे. पुढील दोन वर्षात सर्व ३० लाख कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण होईल. २०१८ च्या यादीतून सुटलेल्या नागरिकांसाठी नव्याने नोंदणी करण्याची परवानगी मिळाल्याने त्यांनाही लवकरच केंद्र सरकारच्या माध्यमातून घरकूल मिळेल. या ३० लाख घरांना केंद्र सरकारच्या अनुदानासोबत राज्य सरकार ५० हजार रुपये देईल आणि प्रत्येक घरावर सौर ऊर्जेचा वापर करून त्यांना मोफत वीज उपलब्ध होईल.

## बिहारमध्ये वोटर अधिकार यात्रा

■ वृत्तसंस्था,सासाराम, दि. १७

बिहारमध्ये विशेष सघन सुधारणा विरुद्ध राहुल गांधी यांची 'वोटर अधिकार यात्रा' सासाराम येथून सुरू झाली. येथील सुआरा विमानतळ मैदानावर झालेल्या जाहीर सभेत राहुल म्हणाले, 'ही संविधान वाचवण्याची लढाई आहे. भाजप-आरएसएस संपूर्ण देशात संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत.'

'जिथे जिथे निवडणुका होतात तिथे ते जिंकतात. महाराष्ट्रातील जनमत सर्वेक्षण म्हणत होते की महाआघाडी निवडणुका जिंकेल. लोकसभेत महाआघाडी जिंकते, परंतु ४ महिन्यांत आपण त्याच भागात हरतो. जेव्हा आम्ही चौकशी केली तेव्हा आम्हाला आढळले की १ कोटी नवीन मतदार जादूने तयार केले गेले आहेत.'

बिहारमधील लोक मते चोरू देणार नाहीत. कारण गरीब आणि कमकुवत लोकांना फक्त मतदानाचा अधिकार आहे. सर्वांना माहिती आहे की आयोग काय करत आहे. आम्ही निवडणूक आयोगाला हे करू देणार नाही. नरेंद्र मोदी जी आणि एनडीए अब्जाधीशांसह सरकार चालवतात. आपचे सर्व पैसे ५-६ अब्जाधीशांना दिले जातात.'

बऱ्याच दिवसांनी जाहीर सभेला उपस्थित राहिलेले राजद सुप्रीमो लालू यादव म्हणाले- 'चोरांना हाकलून लावा, भाजपला हाकलून लावा, आमच्या पक्षाला विजयी करा. भाजपला कोणत्याही परिस्थितीत सत्तेत येऊ देऊ नये. राहुल गांधी, तेजस्वी यादव, तुम्ही सर्वांनी एकत्र या आणि भाजपला मुळापासून उखडून टाका.'

तत्पूर्वी, सभेला संबोधित करताना तेजस्वी म्हणाले, "तुमचे मत चोरीला जात नाहीये, तर ते लुटले जात आहे. बिहार ही लोकशाहीची जननी आहे, तेजस्वी आणि राहुल यांची जोडी येथे मतदानाचा अधिकार संपुष्टात येऊ देणार नाही." 'आज ते मतदार यादीतून नावे वगळत आहेत. उद्या ते पेन्शन आणि रेशन कार्डमधून नावे वगळतील. मोदी सरकार बिहारच्या लोकांना चुना लावू इच्छिते, त्यांना माहित नाही की हा बिहार आहे, इथे लोक खैनीमध्ये चुना मिसळून खातात.'

# राज्यात अतिवृष्टीचा कहर, अनेक गावांचा संपर्क तुटला

## मुंबई, मराठवाड्यासह विदर्भात १२ ठार, विदर्भात ७, नांदेडमध्ये ३, तर मुंबईत २ बळी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

राज्यातील अनेक जिल्ह्यांत शुक्रवारी व शनिवारी पावसाने जोरदार पुनरागमन केले. मराठवाड्यात सर्व जिल्ह्यांत गत दोन दिवस अतिवृष्टी झाली, तर मुंबईत अवघ्या तीन तासांत २०० मिमी पावसाने हाहाकार माजवला. कोकण विभागात गत चार दिवसांपासून आणि विदर्भातही गत २४ तासांपासून मुसळधार पाऊस झाला.

यामुळे उद्भवलेल्या विविध दुर्घटनांमध्ये विदर्भात ७ जणांचा, नांदेडमधील तिघांचा तर मुंबईतील २ असा एकूण १२ जणांचा बळी गेला. चालू महिन्याच्या राज्यात अतिवृष्टीचा...पहिल्या आठवड्यापासूनच दडी मारलेल्या पावसाने राज्यात जवळपास सर्व विभागांमध्ये दमदार वापसी केली. शुक्रवारी व शनिवारी दोन्ही दिवस मराठवाड्यातील नांदेड, बीड, परभणी, धाराशिव, लातूर व हिंगोली या सर्व जिल्हयात अतिवृष्टी झाली.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील गेवराई व बनगावसह काही गावांत काही तासात धुव्वाधार बरसलेल्या पावसामुळे ढगफुटीसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.



शहर परिसरात शुक्रवारी सकाळी ८.३० जे शनिवारी सकाळी ८.३० वाजेपर्यंत २४ तासांत पिसादेवी ७१.२५ मिमी, चौका १००.७५, पिसादेवी व वरूड काझी मंडळात ७२.५० मिमी एवढा जोरदार पाऊस झाला. पावसामुळे पळशी गावातील नदीला पूर आला. यामध्ये २ पूल वाहून गेले. यासोबतच १० घरांत पाणी घुसले.

नारेगावातील नाल्याला पूर आल्याने गोदामात व शेकडो घरात पाणी शिरल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक कार पाण्याखाली बुडाल्या होत्या. बीडमधील १७ मंडळांत, धाराशिवच्या १२ मंडळात, तर परभणीतील ५ अतिवृष्टी झाली. नांदेड जिल्ह्यात ४ मंडळांत अतिवृष्टी झाली. नांदेडच्या कंधार तालुक्यातील कोटबाजार येथे भिंत कोसळून आजी-माजी ग्रामपंचायत सदस्यांचा मृत्यू झाला. जालना जिल्ह्यात शनिवारी सकाळी ८ वाजेपर्यंत ९.३० मिमी पाऊस झाला.

हिंगोली जिल्ह्यात पावसामुळे नदी व नाल्यांना पूर आला आहे. पावसामुळे कळमनुरी ते नांदापूर मार्ग सुमारे चार ते पाच तास बंद होता. दरम्यान, अवघ्या तीन तासांच्या मुसळधार पावसाने मुंबईला पुन्हा तुंबई बनवले आहे. शुक्रवारी मध्यरात्रीनंतर १ ते पहाटे ४ वाजेदरम्यान शहरासह उपनगरांमध्ये २०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली. मुंबईच्या विक्रोळीत पार्कसाईट परिसरात घरावर दरड कोसळल्याने पिता-पुत्रीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, दोघे जखमी झाले. विदर्भात जोरदार पाऊस सुरू असून वेगवेगळ्या घटनांमध्ये ७ जणांचा मृत्यू झाला आहे.

सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कपाशी, काढणीला आलेले मूग, उडीद, हळद, ऊस, सोयाबीन, कपाशी, तूर आदींसह भाजीपाल्यालाही मोठा फटका बसला आहे. शेतातील सुपीक माती व खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. विशेषत मराठवाड्यातील शेतकऱ्यांना या पावसाचा मोठा फटका सहन करावा लागत आहे.

राज्यात रविवार १७ ते २३ ऑगस्टपर्यंत अतिवृष्टीची शक्यता आहे. विशेषतः मराठवाडा,मध्य महाराष्ट्रासह कोकणात रविवार व सोमवार तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह अतिवृष्टीचा अंदाज आहे. १७ व १८ ऑगस्ट रोजी नाशिक,जळगावसह मध्य महाराष्ट्रात मेघगर्जना,विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज आहे.

अनेक ठिकाणी रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला. यासोबतच मुंबईतील रेल्वेसेवाही विस्कळीत झाली. लोकलसह काही रेल्वे गाड्या १५ ते २० मिनिटे उशिराने धावल्या. मुंबईहून मराठवाड्यात येणारी जनशताब्दी एक्स्प्रेस छत्रपती संभाजीनगर स्थानकावर शनिवारी दीड तास उशिराने पोहोचली. मुंबई विमानतळावरून २० उड्डाणे रद्द व ८ उड्डाणे विलंबित झाली.

मांजरा धरणातील ४ दारांमधून ३४९४.२८ क्युसेक इतका विसर्ग होत आहे. कोयना धरण शनिवारी सकाळी आठ वाजेपर्यंत ८५.४४ टक्के भरले. येथेही विसर्ग करण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात पैनगंगा नदीसह इतर नद्या- नाल्यांना पूर आल्याने पूल पाण्याखाली आले.

# बेस्ट पथसंस्थेच्या निवडणुकीत २४ कोटींचा भ्रष्टाचार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ :**



**भाजप नेते प्रसाद लाड यांचा आरोप**

भाजप आमदार प्रसाद लाड यांनी बेस्ट पतसंस्थेच्या निवडणुकीत 24 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, उमेश सारंग आणि सुहास सामंत यांच्यावर थेट आरोप केले आहेत. तसेच आर्थिक गुन्हे शाखेने बेस्टच्या 21 संचालकांना चौकशीसाठी बोलावले असल्याची माहिती समोर आली आहे.

प्रसाद लाड म्हणाले, बेस्ट सहकारी पतसंस्थेतील भ्रष्टाचार घाग आणि गोरे यांच्या तक्रारीमुळे समोर आला आहे. मी माझ्या पतसंस्थेच्या सभासदांना सांगू इच्छितो की, ज्या पद्धतीने बंगले खरेदी, कार्यालय खरेदी, डिपॉझिट किकबॅक घेणे यामुळे प्रथमदर्शी 24 कोटीहून अधिकचा भ्रष्टाचार झाल्याचे गुन्हे शाखेच्या निदर्शनास आले आहे. यात सर्व संचालकांची तर चौकशी होणारच आहे. उमेश सारंग जे पतसंस्थेचे शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष आहेत आणि बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांची देखील चौकशी झाली पाहिजे, अशी त्यांनी मागणी केली आहे.

दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्यात युतीच्या चर्चांना वेग येत असतानाच, दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांच्या कामगार सेनांनी एकत्र येत युती केली आहे.

18 ऑगस्ट रोजी होणाऱ्या या निवडणुकीत ठाकरे गटाची आणि मनसेची बेस्ट कामगार सेना एकत्र लढत असून, त्यांच्या विरोधात भाजपकडून सहकार समृद्ध पॅनल रिंगणात उतरणार आहे.

## ठाकरे ब्रँड संपवण्याची भाषा म्हणजे भाजपने अस्तित्व मान्य केल्याचा पुरावा

# प्रसाद लाडांच्या वक्तव्यावर भास्कर जाधवांचा सणसणीत टोला

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ :**

मुंबईतील दि बेस्ट एम्प्लॉइज को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने युती केली आहे. या युतीवरून भाजप आमदार प्रसाद लाड यांनी टोला लगावत, ठाकरे ब्रँड ही निवडणुकीनंतर बंद होणार आहे, अशी टीका केली. त्यांच्या या विधानावर आता ठाकरे गटाचे नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी प्रत्युत्तर देत भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे.



आमदार भास्कर जाधव म्हणाले की, कोणी तरी जर ठाकरे ब्रँड संपवण्याची भाषा करत असेल, तर त्याचा अर्थ त्यांनी अप्रत्यक्षपणे या ब्रँडचे अस्तित्व मान्य केले आहे. आणखी दोन ठाकरे बंधू एकत्र आले, तर ठाकरे ब्रँड नष्ट करायच्या ऐवजी स्वतःच नष्ट होऊ, अशी भीती काही लोकांना वाटते आणि म्हणूनच त्यांनी अशा वक्तव्यांचा आश्रय घेतलाय, असा खोचक टोला त्यांनी लगावला.

आमदार भास्कर जाधव म्हणाले की, भाजपमध्ये कोण सर्वात अति बोलतो याची स्पर्धाच सुरू असून, अशा वक्तव्याकडे गांभीयार्ने पाहण्याची गरज नाही. सत्ताधारी पक्ष सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सातत्याने करत आहे. त्यांचा छुपा अजेंडा गेल्या शंभर वर्षांपासून सुरू आहे, असा आरोप करत त्यांनी केंद्र आणि राज्य सरकार दोघांवर घणाघात केला.

आमदार भास्कर जाधव म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांना दिलेले शब्द सरकारने पाळले नाहीत. त्रक्रु दाखवून आंदोलन थांबवण्याचे सांगितले, पण प्रत्यक्षात फसवणूक केली. सरकार सतत चिडवायचं आणि चढवायचे काम करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणी नतमस्तक होऊन आरक्षण देण्याची ग्वाही देणारे आता माघार घेत आहेत, अशी स्पष्ट शब्दांत टीका जाधव यांनी केली.

## चप्राड शेतशिवारात वीज पडून गुराख्याचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. १७**

गुराखी म्हणून शेळ्या चरण्यासाठी गेलेल्या एका ६८ वर्षीय वृद्धाचा वीज कोसळून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी दुपारी घडली. चपराड पहाडीजवळील शेतशिवारात ही घटना घडली असून, लाखांदूर पोलिसांनी याची नोंद घेतली आहे. मनोहर वाकडू कुंभले (६८, रा. चप्राड) असे मृत गुराख्याचे नाव आहे. चप्राड येथील मनोहर वाकडू कुंभले, मनोहर शहारे आणि कारु खेडकर हे तिघे दुपारी त्यांच्या शेळ्या घेऊन चप्राड पहाडीजवळील शेतात गेले होते.

# महसूल मंत्र्यांच्या नावाने फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १७**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने फोन करून एका शेतकऱ्याची फसवणूक करण्याचा प्रकार छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आला आहे. एका अज्ञात व्यक्तीने स्वतःला बावनकुळे साहेबांचे पर्सनल असिस्टंट असल्याचे भासवत शेतकऱ्याला फोन केला आणि त्याचे काम मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर संबंधित व्यक्तीने स्कॅनर पाठवून पैसे पाठवण्याची मागणी केली होती.

शेतकऱ्याला संशय आल्यावर त्याने तात्काळ छत्रपती संभाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस सायबर फसवणुकीच्या या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत.

जगन्नाथ जयाजी शेळके असे फसवणूक झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून, त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अधिकृत फेसबुक पेजवर आपली अडचण मांडली होती. त्यांनी पोस्टद्वारे सांगितले की, आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी रस्ता अडवून त्यांच्या वडिलोपार्जित शेतीवर अतिक्रमण केल्यामुळे लागवड करणे शक्य होत नाही. ही बाब शेअर केल्यानंतर काही वेळातच एका अज्ञात व्यक्तीने फोन करून स्वतःला बावनकुळे साहेबांचा पी.ए. असल्याचे भासवले आणि शेतकऱ्याच्या समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

या व्यक्तीने रस्त्याची मोजणी करण्यासाठी माणसे पाठवतो असे सांगत, पोलीस बंदोबस्तासाठी पैसे भरण्याची मागणी केली. यासाठी त्याने क्यूआर कोड पाठवत पैसे पाठवण्यास सांगितले. या फोनवर दोघांमध्ये संवादही झाला असून, शेतकऱ्याने त्या संभाषणाचा रेकॉर्ड पोलिसांकडे सादर केला आहे. यावरून छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

पीडित शेतकरी जगन्नाथ जयाजी शेळके यांच्याकडून अज्ञात व्यक्तीने अशाप्रकारे दोन वेळा पैशांची मागणी केली. सुरुवातीला आपले काम मार्गी लागेल, या आशेने शेतकऱ्याने 3 हजार रुपये पाठवले देखील. मात्र, त्यानंतरही पुन्हा पैशांची मागणी सुरू राहिल्याने त्यांना फसवणुकीचा संशय आला. त्यामुळे शेवटी त्यांनी छत्रपती संभाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या प्रकरणात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाचा वापर करून शेतकऱ्याची फसवणूक करणारा हा अज्ञात व्यक्ती नेमका कोण आहे, याचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. सद्यस्थितीत पोलिसांनी शेतकरी आणि आरोपी यांच्यातील कॉल रेकॉर्डिंगच्या आधारे पुढील तपास सुरू केला असून, फसवणुकीचा हा प्रकार गंभीरतेने घेतला जात आहे.

# बापाने ४ मुलांना विहिरीत ढकलून स्वतःलाही संपवले

■ **महासागर प्रतिनिधी**
**अहिल्यानगर, दि. १७ :**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यात रविवारी एक हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. कौटुंबिक वादाने त्रस्त झालेल्या एका बापाने आपल्या चार लहान मुलांसह आत्महत्या केल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. अरुण काळे (वय 30, रा. चिखली कोरेगाव, ता. श्रीगोंदा) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. पत्नीसोबतच्या वादामुळे आलेल्या नैराश्यातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर येत आहे.

अरुण काळे यांचा आठ दिवसांपूर्वी त्यांच्या पत्नीसोबत वाद झाला होता. या वादामुळे त्यांची पत्नी त्यांना सोडून आपल्या माहेरी येवला येथे निघून गेली होती. पण ती परत येत नव्हती. अरुण काळे आपल्या चार मुलांसह मोटारसायकलवरून श्रीगोंदा येथून कोहाळे शिवारात आले. शिर्डी-नगर बायपासजवळ मोटरसायकल उभी करून त्यांनी चारही मुलांना विहिरीत ढकलले



आणि त्यानंतर स्वतःही उडी मारली असावी, असा पोलिसांचा अंदाज आहे.

या घटनेत अरुण काळे यांच्यासह त्यांची मुलगी शिवानी (वय 8) आणि तीन मुले प्रेम (वय 7), वीर (वय 6) आणि कबीर (वय 5) यांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. विहिरीतून तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले असून, उर्वरित दोन जणांचा शोध सुरू आहे. घटनास्थळी पोलिसांना अरुण काळे यांचा मृतदेह एक हात व एक पाय दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आला.

# सत्तेच्या हव्यासापोटी निवडणूक आयोगाला गप्प केले

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

जगदीप धनखड यांच्यासारखेच तत्कालीन निवडणूक आयुक्तही 'बेपत्ता' असा गंभीर आरोप करत, खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. नारायण राणेंना त्यांनी "वयाचं भान ठेवून बोलावं" असा इशारा दिला, तर मुंबई महापालिकेची लूट करणारे फडणवीस यांच्यासोबत बसत असल्याची सडकून टीका केली. सत्ताधाऱ्यांनी लोकशाहीची थट्टा थांबवावी, अन्यथा महाराष्ट्र गप्प बसणार नाही, असा स्पष्ट इशाराही राऊतांनी दिला.

मुंबई आणि ठाणे मनपाची लुट करणारे फडणवीस यांच्या सरकारमध्ये आहेत. मुंबई मनपाच्या 90 हजार कोटी रुपयांच्या ठेवी



**संजय राऊत यांचा आरोप**

आमच्या काळात ठेवण्यात आल्या. हे काय आम्ही मुंबई लुटल्यामुळे ठेवल्या का? असा सवाल उबाठाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे. तर जे सरकार इतक्या मोठ्या ठेवी ठेवते, ते काय लुटल्यामुळे ठेवली का? या ठेवीची नगरविकास मंत्र्यांनी लुट केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, तिजोरीत पैसे नसताना 2 लाख कोटी रुपयांची कामे देण्यात आली. कुणाला कोणती कामे देण्यात आली माहिती नाही. पण 2 लाख कोटी रुपयांच्या कामासाठी 25 टक्के कमिशन यांच्याकडे पोहोचले आहे. यात देवेंद्र फडणवीस यांची लोक देखील आहेत. मुंबई मनपा कुणी लुटली हे लोकाना माहिती आहे.

संजय राऊत म्हणाले की, लुटमार करणाऱ्यांच्या हंड्या फोडण्याकरता तुम्ही मुंबई ते ठाणे फिरत आहात. हंडीमधील दही ज्यांनी लुटून खाल्ले आहे, त्यांच्या हंड्या आपण फोडत आहात त्याला काय म्हणायचे. फडणवीस यांच्या आजुबाजूला जे चोर-दरोडेखोर आहेत त्यांना आपण काय म्हणायचे? त्यांना पाठीशी घालू नका, महाराष्ट्र तुम्हाला माफ करणार नाही. गौतम अदानी यांची हंडी कोण फोडत आहे. ही लोक अदानीची हंडी फोडणारी लोक आहेत.

## महालक्ष्मी गडावर दरड कोसळली

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

डहाणू तालुक्यातील प्रसिद्ध महालक्ष्मी गडावर शनिवार १६ ऑगस्ट रोजी मुसळधार पावसामुळे दरड कोसळून सात दुकानांपैकी चार दुकाने दरीत कोसळली असून इतरांवर दगडी पडल्यामुळे नुकसान झालं आहे. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

महालक्ष्मी गडाच्या सुळक्यावरून मंदिर परिसरातील दुकानांवर दरड कोसळली असून दरडी सह चार दुकाने दरीत कोसळली आहेत. तसेच या घटनेमुळे मंदिरात जाणार अरुंद रस्त्यावर देखील परिणाम झाला आहे. सुदैवाने पावसामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांची वर्दळ कमी असल्यामुळे मोठी हानी टळली आहे. महालक्ष्मी सुळक्यावरून छोट्या मोठ्या प्रमाणात दरड कोसळण्याचे प्रकार काही वर्षांपासून सुरू असून २०२२ साली गडावर अश्याच प्रकारची मोठी दरड कोसळली असून यामध्ये तीन दुकानांचे नुकसान झाले होते. महालक्ष्मी गडावर भाविक देवीच्या दर्शनासाठी येत सुट्ट्यांच्या दिवशी भाविकांची गर्दी होते.

# राज्यात पुढील २४ तासासाठी पुणे घाट भागात रेड अलर्ट

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

राज्यात पुढील २४ तासासाठी पुणे घाट भागात रेड अलर्ट देण्यात आला असून पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, या जिल्ह्यात तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

भारतीय हवामान खात्याकडून १७ ते २१ दरम्यान अति अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अधिकच्या अतिवृष्टी इशाऱ्यामुळे भूस्खलनाच्या अनुषंगाने सर्व आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हा प्रशासनाला कळविण्यात आले आहे.

या दरम्यान समुद्राची स्थिती खवळलेली व ताशी ५०-६० किमी वारे वाहण्याची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली असून खेड शहरातील जगबुडी नदीचे पाणी खेड - दापोली रस्त्यावर आल्याने खेड शहरांतून दापोलीकडे जाणारी वाहतूक सुरक्षास्तव बंद करण्यात आली आहे आणि जिल्हा प्रशासना मार्फत नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणातून तापी नदीपात्रामध्ये सद्यस्थितीत २८०७५ क्युसेक्स तसेच यवतमाळ जिल्ह्यातील इसापूर धरणातून पेनगंगा नदीपात्रात ५४४६६ क्युसेक इतका विसर्ग सूरू आहे.

प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थिती करिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## अण्णा हजारे विरोधात बॅनरबाजी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

काँग्रेस पक्षाचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाचा डेटा दाखवत मतांची चोरी झाल्याचे दाखविले. त्यावरून विरोधक आक्रमक होत रस्त्यावर देखील उतरले, त्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले. त्या सर्व घडामोडी दरम्यान जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना लक्ष्य करणारे फ्लेक्स पुण्यातील पाषाण येथील रस्त्यावर लावण्यात आले आहे.

अण्णा, दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर पुन्हा तुमची जादू पाहण्यासाठी देश आतुर आहे.अशा आशयाचे बॅनर लावण्यात आला आहे.तर या अनोख्या फ्लेक्स बाजीची पुणे शहराच्या राजकीय वतुर्ळात चर्चा रंगू लागली आहे.

## डिलेव्हरी बॉयवर बंदुक रोखून गोळीबार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७**

सर्वत्र गोपाळकाला उत्साहात साजरा होता असताना शनिवारी लोअर परळ येथे औषधांच्या देय रकमेवरून झालेल्या वादातून डिलेव्हरी बॉयवर गोळीबार केल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी ना.म. जोशी मार्ग पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून बँकेत काम करणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. गुन्ह्यांत एअरगनचा वापर करण्यात आल्याचे प्राथमिक पाहणीत दिसून येत असून बॅलेस्टिक चाचणीसाठी न्यायावैद्यक प्रयोगशाळेत पाठवण्यात येणार आहे.

## मुंढव्यात वाहतूक पोलिस उपायुक्तांच्या गाडीला धडक

# दोन पोलिस कर्मचारी जखमी

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. १७ :**

मुंढवा परिसरात गणपती उत्सवानिमित्त खरेदी निमित्त होत असलेली वाहनांची गर्दी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने वाहतुक पोलिस आयुक्त व त्यांच्यासोबत दोन पोलिस कर्मचारी चालले असताना समोरून भरधाव वेगात असलेल्या मद्यधुंद कार चालकाने जोरदार धडक दिली. धडकेत दोन पोलिस कर्मचारी जखमी झाले. यामध्ये वाहतुक पोलिस उपायुक्त हिमंत जाधव यांना सुदैवाने इजा झाली नाही. याप्रकरणी धडक देणा?या चालकासह दोघांना मुंढवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

याप्रकरणी समदिप मनमोहन सिंग (३०, रा. शुभ इवान, मिडोरी वाईन्स जवळ, केशवनगर, मुंढवा मुळ रा. हरीयाना) याला याप्रकरणी ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलिस नाईक शरद अर्जुन पवार (३८, रा. हिंद कॉलनी, भेकराईनगर, पुणे) यांनी मुंढवा पोलिस ठाण्यात दिलेल्या फियार्दीवरून चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार शरद पवार ह पोलिस मुख्यालयात २०२२ पासून नेमणुकीस आहे. सध्या ते वाहतुक पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांच्याकडे शासकीय वाहनावर ऑपरेटर म्हणुन कार्यरत आहे. दि. १५ ऑगस्ट रोजी पवार हे कामावर आले असताना सोबत चालक पोलिस हवालदार तानाजी कोंढाळकर हे देखील होते. कोंढाळकर हे गाडी चालवत असताना पवार त्यांच्या शेजारील सीटवर बसले होते. तर पोलिस उपायुक्त हिंमत जाधव गाडीच्या मागील सिटवर बसलेले होते.

मुंढवा येथील कुंभारवाडा येथे गणेशमूर्ती विकत घेण्याकरता नागरिकांची व वाहनांची गर्दी होत असल्याने केशवनगर कुंभारवाडा या भागाची पाहणी करण्यासाठी आले होते. पाहणी करून झाल्यावर सव्वा दहा ते साडे दहा वाजण्याच्या सुमारास कुंभारवाडा येथून मुंढवा चौकाकडे परत जात असताना रोडला नागरिकांची गर्दी होती. त्यामुळे कोंढाळकर हे कार हळू चालवत होते. पोलिस उपायुक्त बसलेली गाडी मुंढव्यातील केशवलीला अपार्टमेंट येथे आली असताना मुंढवा चौकाकडून केशवनगरकडे जाणाऱ्या भरधाव कारने पोलिस उपायुक्तांच्या गाडीला धडक दिली. या अपघातात पोलिस नाईक पवार यांच्या ओठाला व दाताला दुखापत झाली. तर चालक कोंढाळकर यांचे डाके दरवाज्यावर आपटल्याने त्यांच्या डोक्याला मुकामार लागला. या अपघातनंतर पोलिस उपायुक्त व पवार यांनी गाडीतून उतरून पाहिले असता उजव्या बाजूने गाडीची पूर्ण बॉडी डॅमेज होऊन चाक मागील बाजूस सरकले होते. धडक देणाऱ्या गाडीची पाहणी केली असता, ती कार संदीप सिंग चालवत असल्याचे समजले. त्याच्यासोबत मनीषकुमार सुमानकुमार सिंग (२८, रा. शुभ शगुन सोसायटी, जुना मुंढवा रोड, खराडी) असल्याचे समजले. पोलिस उपायुक्तांनी लागलीच स्थानिक मुंढवा पोलिसांना बोलवून मद्यधुंद अवस्थेत असलेल्या दोघांना पोलिसांच्या हवाली केले. याप्रकरणी पुढील तपास मुंढवा पोलिस करत आहेत.

# पुनीत बालन ग्रुपची संयुक्त डीजे मुक्त दहीहंडी

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. १७ :**

गोविंदा रे गोपाळाचा जयघोष, ढोल ताशांचा मंगलमय गजर, महाकाल नृत्य आणि मुंबईतील प्रसिद्ध वरळी बिट्स यांच्या पारंपारिक संगीतावर थिरकणाऱ्या तरुणाईचा उसळलेला जनसागर अशा उत्साही वातावरणात पुनीत बालन ग्रुप आयोजित २६ सार्वजनिक मंडळांची संयुक्त अशा दहीहंडीचा थरार पुणेकरांनी अनुभवला. ऐतिहासिक लाल महाल चौकात तुडुंब गर्दीसमोर राधेकृष्ण ग्रुपने सात थर रचत ही संयुक्त दहीहंडी फोडण्याचा बहुमान मिळवला. महाराष्ट्रातील पहिली



डीजे मुक्त दहीहंडी साजरा करीत एक नवा आदर्श यानिमित्ताने पुनीत बालन ग्रुपने मांडला.

शहरातील २६ सार्वजनिक मंडळांनी एकत्र येऊन पुनीत बालन ग्रुपच्या माध्यमातून संयुक्त दहीहंडी उत्सव सुरू केला आहे. या वर्षीचीं संयुक्त दहीहंडी डीजे मुक्त साजरी करण्याची घोषणा पुनीत बालन केली होती. त्यामुळे या डीजे मुक्त दहीहंडीला पुणेकर कसा प्रतिसाद देणार याबाबत उत्सुकता होती. मात्र, ढोल ताशाचा गजर आणि वरळी बिटसने वाजवलेल्या संगीतावर हजारो पुणेकरांनी ठेका धरला आणि डीजे मुक्त दहिहंडीचा प्रयोग यशस्वी करत एक नवीन पायंडा पाडला.

प्रभात बॅन्डच्या सुमधुर वादनाने या दहीहंडी कार्यक्रमाची सुरवात झाली. युवा वाद्य पथक, समर्थ पथक, रमणबाग आणि शिवमुद्रा या ढोल पथकांच्या जोरदार वादनाने या कार्यक्रमाची रंगत वाढविली आणि वरळी बिट्सच्या बॅडने केलेल्या वादनाने अवघे वातावरण दंगून गेले.

यावेळी अभिनेता व दिग्दर्शक प्रविण तरडे, अभिनेता हार्दिक जोशी, मराठी बिग बॉस फेम ईरिना यांच्यासह अनेक मराठी कलाकारांनी या उत्सवाला हजेरी लावली. यावेळी दहीहंडीच्या सलामीकरीता वंदे मातरम दहीहंडी संघ, नटराज संघ, म्हसोबा संघ, भोईराज संघ, गणेश मित्रमंडळ संघ, गणेश महिला गोविंदा पथक, गणेश तोफखाना दहीहंडी संघ, नवज्योत ग्रुप संघ, इंद्रेश्वर संघ (इंदापूर), शिवकन्या गोविंदा पथक (चेंबुर-मुंबई), शिवतेज ग्रुप, दहिहंडी संघ यांसारख्या अनेक गोविंदा पथकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. रात्री पावणे दहा वाजता राधेकृष्ण ग्रुपने सात थर रचत ही ऐतिहासिक दहीहंडी फोडण्याचा मान मिळविला.

# शिव भक्तांना सेवा देण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

गांधी ग्राम ते अकोला कावड यात्रा २०२५ करीता मोठ्या संख्येने भाविक दरवर्षी येतात यावर्षी हि मोठी गर्दी होणार असल्याने शिव भक्तांनाआरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे याकरिता जिल्हाधिकारी अजित कुंभार मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम उपसंचालक आरोग्य सेवा डॉ कम लेश भंडारी यांचे मार्गदर्शनाखाली डॉक्टर बळीराम गाढवे यांनी नियोजन करून सर्व शिवभक्तांना आरोग्य सेवा पुरवण्याची व्यवस्था केलेली आहे. कावड मार्गावर १० उपचार केंद्र उपलब्ध करण्यात आले आहेत. , सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी , औषध निम र्ण अधिकारी, आरोग्य सेविका ,आरोग्य सेवक वाहन चालक इत्यादी अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती केलेली आहे. उपचार केंद्राचे ठिकाणी तसेच आरोग्य उपकेंद्रामध्ये आवश्यक तो औषध साठा उपलब्ध करून ठेवण्यात आलेला आहे .कावड मार्गावर काम करणाऱ्या आरोग्य कर्मचारी अधिकारी यांना विशेष गणवेश टी-शर्ट, टोपी पुरविण्यात आलेली आहे .पिण्याचे पाण्याचे वेळोवेळी परीक्षण करण्यात येत आहे. तसेच शिवभक्तांना ठिकठिकाणी आरोग्य शिक्षण देण्याकरिता आरोग्य संदेश असलेले डिजिटल बोर्ड, बॅनर ,हस्त पत्रिका यांच्याद्वारे तसेच आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे .या मार्गावर एकूण ९ रुग्णवाहिका अत्यावत ठेवण्यात आलेले आहेत. उपचार केंद्राचे ठिकाणी टेंथ द्वारे निवारा करण्यात आलेला आहे.

## डाबकीरोड वासी कावडचे मान्यवरांच्या हस्ते पूजन

# ऐतिहासिक कावडीकडे सर्वांचे लक्ष




▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

अकोला येथील श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी निघणारी कावड यात्रेला ऐतिहासिक महत्त्व आहे. आणि त्यातही ज्या भव्य कावडीकडे सर्वांचे लक्ष असते त्या डाबकीरोडवासी कावडचे आमदार वसंत खंडेलवाल, पंकज देशमुख, माजी महापौर विजय अग्रवाल आणि मान्यवरांनी पूजन केले. हर हर महादेवचा जयघोष करण्यात आला. डाबकीरोडवासी कावड वैशिष्ट्यपूर्ण असते. मोठ्या संख्येने भरणे कावडीला असतात तसेच जयहिंद चौकातून ही कावड राजराजेश्वर मंदिराकडे वळते तेव्हा विहंगम



दृश्य दिसते. हा क्षण डोळ्यात सामावून घेण्याकडेसर्वांचे लक्ष असते. काही वेळा तर २१०० भरण्यांची कावड घेऊन पूर्णेच्या जलाने राजराजेश्वराला अभिषेक करण्यात आला होता. यंदा देखील मंडळाने भव्य कावड तयार केली आहे. रविवारी कावड पूजेला प्रतुल हातवळणे, सतीश ढगे, योगेश गोतमारे, विलास शेळके, अर्चना शर्मा, मंजुषा सावरकर, वैशाली शेळके, करण साहु, मनोज गायकवाड, नितीन झापर्डे, संदीप पवार यांच्या सह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाआरती झाल्यानंतर हजारोच्या संख्येने डाबकीरोड वासी शिवभक्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हर्रबोला महादेवचा गजर करीत गांधीग्रामकडे कुच केली. ग्रांधीग्रामकडे मोठ्या ऐटीत रवाना होणाऱ्या या कावडला पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## पालखी/कावढ मिरवणूक मार्गावरील स्टेजसाठी

### परवानगीकरीता मनपा नगर रचना कार्यालय सुटीच्या दिवशीही सुरू

▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिका क्षेत्रात श्रावण मासाच्या शेवटच्या सोमवारी राज राजेश्वर नगरीत विविध मंडळ व नागरिकांव्दारे मोठ्या उत्साहात पालखी/कावढ मिरवणूक काढण्यात येत असते. तसेच मिरवणूक मार्गावर विविध मंडळ, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांव्दारे स्वागतासाठी तसेच प्रसाद वितरणासाठी स्टेज उभारणी करण्यात येत असते. त्यांच्या परवानगीसाठी मनपा नगररचना कार्यालयातून परवानगी घेण्यात येत असते. स्टेजची टाकण्यासाठीची परवानगी घेण्यासाठी भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये शनिवार आणि रविवार सुटीच्या दिवशीही परवानगी घेण्यासाठी मनपाचा नगररचना कार्यालय कार्यालयीन वेळेत सुरू असून कृपया याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

# भव्य महावीर दहीहंडी मोहोत्सव

## शास्त्री नगरचे गोविंदा पथक पटकावले ११ हजाराचे पारितोषिक



▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

आशिष पवित्रकार मित्र परिवारतर्फे भव्य महावीर दहीहंडी मोहोत्सव २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. हा मोहोत्सव शनिवार, दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत छत्रपती संभाजी पार्क, जवाहर चौक, प्रभाग क्र. १३, अकोला येथे पार पाडला कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मध्ये माझी पालकमंत्री डॉ रणजीत पाटील साहेब तसेच माननीय आमदार अमोल दादा मिटकरी साहेब तसेच विठ्ठल जी सराफ युवा सेना सचिव माजी नगरसेवक हरीशभाइ आलिमचंदानि, सिव्हिल लाईनच्या ठाणेदार कयाते मॅडम तसेच निकम मॅडम पंकज देशमुख आरसीसी कोचिंग क्लास चे गोकुळ राख सर व प्रल्हाद सर संजय जी चौधरी,तसेच सिने अभिनेत्री श्वेता ताई सिंगल यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

# पावसातही गोगा नवमी शोभा यात्रेचा उत्साह कायम

▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

शहरात शनिवारी रात्री वाल्मिकी समाजाचा गोगा नववी उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला उशिरा रात्रीपर्यंत गोगादेव महाराजांच्या छडी निशाणला आकर्षक रित्या सजवून शहरात शोभायात्रा काढण्यात आली या शोभा यात्रेत वाल्मिकी समाजाचे शेकडो महिला व पुरुष नागरिक उपस्थित होते छडी निशाण यात्रा आपापल्या परिसरातून काढण्यात आली डीजे आणि ढोल ताशाच्या धून वर गोगादेवचा जयजयकार करीत युवक पवित्र निशान घेऊन पुढे जात होते शिवनगर अकोट फाईल खदान आदी परिसरातून या पवित्र निशांनची शोभायात्रा काढण्यात आली नंतर हे सर्व पवित्र निशान सिटी कोतवाली चौकात एकत्र आल्यानंतर व त्यांचे यथायोग्य पूजन केल्यानंतर शोभायात्रीची समाप्ती करण्यात आली या शोभा



यात्रेदरम्यान पावसाच्या मुसळधार सरी बरसत असताना सुद्धा गोगा नवमी शोभायात्रेत सामील झालेल्या युवक महिला व पुरुषांचा उत्साह थोडा देखील कमी झाला नव्हता हे विशेष या दिवशी गोगा महाराजांची पूजा केल्यानंतर सर्पदंशाचे भय दूर होते तसेच संतान आणि सुखाची प्राप्ती होते.

## रामदास पेठच्या दत्त मंदिरात कृष्ण जन्माष्टमी साजरी

अकोला-स्थानिक रामदास पेठ येथील श्री नाथ दत्त मंदिर येथे कृष्ण जन्माष्टमी मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली. मध्यरात्री आयोजित या जन्मोत्सव सोहळ्याचा परिसरातील भक्तांनी सहभाग घेतला.यावेळी आकर्षक झोपाळा सजविण्यात येऊन तान्ह्या कृष्णाला यात झोके देत आनंदोत्सव जल्लोषात साजरा करण्यात येऊन कृष्ण जन्मोत्सवाच्या शुभेच्छा देम्यात आल्यात.

# गांधीग्राम पुर्णा नदी येथे शोध व बचाव पथके सज्ज

▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

दि.१७/०८/२०२५ रोजी श्रावण महीण्यातील चवथ्या सोमवारच्या अनुषंगाने पुर्णा नदी गांधीग्राम ता.अकोला येथे बचाव पथक सज्ज ठेवण्यात आले आहेत. मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार उपविभागीय अधिकारी अकोला व तहसीलदार अकोला यांचे मार्गदर्शनामध्ये दि.१७/०८/२०२५ रोजीचे दुपारपासुन रात्रभर सर्व कावड पुर्णा नदीवरुन पुर्णपणे निघेपर्यत पुर्णा नदी गांधीग्राम येथे आपत्ती व्यवस्थापन बचाव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. गांधीग्राम येथे अकोला तहसीलचे नायब तहसीलदार महेंद्र आत्राम, मंडळ अधिकारी दत्ता काळे, प्रशांत सायरे, हरीहर निमकंडे तसेच आपात्कालिन पथकाचे सुनिल कल्ले ,दिपक सदाफळे ,नजर अली ,गौतम मोहोड, रुषिकेश राखोडे, रणजित घोगरे इत्यादी सदस्य तसेच संत गाडगेबाबा आपात्कालिन पथक ,वंदे मातरम आपत्कालिन पथक ,माँ चंडीका आपत्कालिन पथक पैलपाडा , विर एकलव्य आपत्कालिन पथक पोपटखेड या पथकांचे सदस्य बोट, लाईफ जॅकेट,लाईफ रिंग, इत्यादी साहीत्यासह उपस्थित आहेत.

### लाखपुरी ता.मुर्तिजापुर येथे शोध व बचाव पथक सज्ज

**मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी येथील पुर्णा नदी येथे मोठया प्रमाणात मुर्तिजापुर व दर्यापुर तालुक्यातील शिवभक्त पुर्णा नदीचे जल आणण्यासाठी लाखपुरी येथे जातात त्याअनुषंगाने तहसीलदार मुर्तिजापुर यांचे मार्गदर्शनामध्ये लाखपुरी येथे बचाव पथक सज्ज राहणार आहे. दि.१७/०८/२०२५ रोजीचे दुपारपासुन रात्रभर सर्व कावड पुर्णा नदीवरुन पुर्णपणे निघेपर्यत सदर पथक पुर्णा नदी येथे सज्ज राहील. सदर ठिकाणी नायब तहसीलदार रविंद्र राउुत, मंडळ अधिकारी पुरी, उमेश आटोटे, पदीप मोहोड, विर भगतसिंग पथक कुरणखेड ,लाखपुरी येथील आपत्कालिन पथक बचाव साहीत्यासह सज्ज आहेत.**

# बंजारा समाजाचा तीज महोत्सव शेकडो महिलांनी केला साजरा



▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

बंजारा समाजाच्या तीज महोत्सवात बंजारा समाजाची पारंपरिक वेशभूषा राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सौ प्रतिभा ताई अवचार यांनी वेशभूषा करून बंजारा समाजाच्या सर्व पारंपारिक उत्सवांमध्ये सकाळपासून सहभागी होऊन तीज महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला कातखेड येथील बंजारा समाजाच्या पंचफुलाबाई राठोड, रुखमाबाई चव्हाण, रेणुकाबाई जाधव, यमुना आडे, ताई बाई जाधव, मंदाबाई राठोड, फुलाबाई जाधव, वंदना चव्हाण, मंदाबाई राठोड, वंदनाताई पवार, सुनीताबाई जाधव, आशाबाई राठोड, लक्ष्मीबाई राठोड, विठ्ठल राठोड ड फला वादक, जयराम जाधव, नायक गोवर्धन राठोड, बाबू सिंग राठोड यांच्यासह बंजारा समाजातील शेकडो महिला या तिज महोत्सवात सहभागी झाल्या होत्या यावेळी तीज महोत्सवाचे महत्त्व सौ प्रतिभा अवचार जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी महिला काँग्रेस यांनी विशद करून समाजाचे राष्टपती असलेले योगदान यावेळी व्यक्त केले यावेळी बंजारा समाजातील शेकडो महिला सह आजूबाजूच्या गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राणी सती धामच्या भादवा महोत्सवात कृष्ण नृत्य उत्सव

**अकोला:**स्थानिक राणी सती धाम येथे राणी सती दादींच्या आठ दिवसांच्या वार्षिक भादवा बदी महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. २३ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या आठ दिवसांच्या उत्सवाची सुरुवात शनिवारी सामूहिक सुंदरकांडाने झाली.या उत्सवात भाविकांनी सामूहिक सुंदरकांड सादर करून उत्सवाची सुरुवात केली. संचालन फूलचंद पटवारी यांनी केले. रात्री धाम येथे कृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. या उत्सवात नृत्य प्रशिक्षक अर्चना गुप्ता भट्ट यांच्या मुलींच्या पथकाने कृष्ण लीलावर आधारित नृत्यनाट्य सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मुलींनी एकामागून एक कृष्ण भक्ती नृत्य सादर करून जल्लोष निर्माण केला.

## थोडक्यात

### किड्स पॅरडाईज मध्ये जन्माष्टमी उत्साहात



**पातूर :** येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल येथे जन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्साहात पार पडली. गोविंदा गोविंदाचा गजर करत श्रीकृष्ण जन्माष्टमी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्साहात साजरी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण ची वेशभूषा तर विद्यार्थिनींनी राधाच्या वेशभूषेत येऊन हा उत्सव साजरा केला. याप्रसंगी दहीहंडीचे पूजन शाळेच्या कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी केले. तर हा उपक्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नरेंद्र बोरकर, नितु ढोणे, संकल्प व्यवहारे, हरिष सौंदळे, बजरंग भुजबटराव, अविनाश पाटील, अक्षय तायडे, प्रतीक्षा भारसाकळे, प्रियंका चव्हाण, पूजा खंडारे, रेश्मा शेंडे, इकरा आदिबा खान, साक्षी वानखडे, शुभांगी बोरकर, दिव्या गव्हाळे, नयना पटोणे, प्रिया चक्रे, गौरी अम ानकर, रुपाली पोहरे, कल्पना वानेरे, शुभम पोहरे, मधुकर बोदडे आदींनी परिश्रम घेतले.

# होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी कामाला लागावे : आ.अमोल मिटकरी

▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

अकोला येथे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती ,नगरपरिषद ,नगरपंचात, व ग्रामपंचायत निवडणुकी संदर्भात आढावा व नवनियुक्त जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठकआ अमोल दादा मिटकरी यांच्या मार्गदर्शनाखाली व मोहम्मद बदरुज्जमा जिल्हाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार अमोल दादा मिटकरी यांनी मार्गदर्शन करताना होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आव्हान केले.




यावेळी मोहम्मद बदु जमा यांनी मार्गदर्शन करताना बुथ बांधणी लवकरच करू असे आश्वासन दिले. यावेळी सह सर्व फ्रंटल व सेल चे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी व तालुका व शहर अध्यक्ष , कार्याध्यक्ष, उपस्थित होते अशी माहिती जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अनिल मालगे यांनी दिली.

# शिवनी, शिवर येथील अतिक्रमणावर अतिक्रमण विभागाव्दार कारवाई

▪अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :

१४ ऑगस्ट २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिकेच्या निळकंठ सूतगिरणी ते शिवर, छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकापर्यंतच्या महाम ार्गावरील दोन्ही बाजूने असलेल्या अतिक्रमणावर पुर्व झोन आणि दक्षिण झोन यांच्या संयुक्त विद्यम ाने अतिक्रमण विभागाव्दारे निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईत सहा.आयुक्त देविदास निकाळजे, राजेश सरप, सहा.अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, नगर रचनाचे कनिष्ठ अभियंता प्रतीक कटियारमल यांचेसह मनपा पुर्व आणि दक्षिण झोन तसेच अतिक्रमण विभागातील



कर्मचा-यांचा समावेश होता.

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णजयंती महोत्सवानिमित्त पालखी आयोजन

▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णजयंती महोत्सवानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रांगणात दि. १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी संत ज्ञानेश्वर महाराज यांची प्रतिमा व ग्रंथाची पालखीम ध्ये मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमात टाळ मृदंगाच्या तालासुरात व हरी विठ्ठल नामाच्या जयघोष, फुगडी, पावली या सारखे भक्तीमार्गाचे खेळ यामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेची जिल्हा परिषद परिसरात पालखीमध्ये मिरवणूक काढण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अनिता मेश्राम यांनी या पालखी मि रवणुकीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. 'गण गण गणात बोते' या गीतावर सुरू असलेल्या महिलांच्या फुगडी, 'पावली' खेळामध्ये सहभाग घेत आनंद लुटला. पालखी मध्ये शालेय विद्यार्थी, वारकरी मंडळ, भजनी मंडळाचे महिला पुरुष यामध्ये सहभागी झाले होते. संपूर्ण जिल्हा



परिषद परिसरातील वातावरण भक्तीमय झाले होते. या पालखी सोहळ्यामध्ये जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, महिला व बालकल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजश्री कोलखेडे, शिक्षणाधिकारी प्राथमिक रतनसिंग पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी हरिनारायण परिहार, विस्तार अधिकारी पंचायत उल्हास मोकळकर, विस्तार अधिकारी शिक्षण अरविंद जाधव आदि यावेळी उपस्थित होते.

या पालखीमध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताई यांची वेशभूषा करून विद्यार्थी सहभागी झाले होते. या पालखी सोहळ्याची मुख्य जबाबदारी शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी अरविंद जाधव यांच्यावर सोपवण्यात आली होती.

# सावरगाव येथे घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट; लाखोंचे नुकसान

▪पातुर,दि १७ (प्रतिनिधी) :

तालुक्याच्या अतिदुर्गम सावरगाव गावात १४ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता घरगुती गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडली. या घटनेत अल्पभूधारक शेतकरी देविदास नामदेव सोंडकर यांच्या घरातील मौल्यवान वस्तू, धान्य व इतर साहित्य जळून खाक झाले.मिळालेल्या माहितीनुसार, देविदास सोंडकर यांच्या घरातील गॅस सिलेंडर अचानक स्फोट झाला. या स्फोटामुळे पलंग, कुलर, गॅस शेगडी, कपडे, गहू, ज्वारी, भुईमूगसेंग यांसह घरातील इतर जीवनावश्यक साहित्य क्षणात जळून खाक झाले. आगीची तीव्रता इतकी होती की, गावात एकच खळबळ उडाली. प्रचंड आवाज व ज्वाळा दूरवरूनही दिसत होत्या. सुदैवाने, गावकऱ्यांच्या तत्परते मुळे घरातील सर्व सदस्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. गावकऱ्यांनी एकत्र येऊन आगीवर नियंत्रण मिळवले, अन्यथा हानी आणखी मोठी झाली असती.

घटनेची माहिती मिळताच तलाठी मिलिंद इचे व सावरगाव ग्रामपंचायत सचिव समाधान साळोकार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनामा करून तहसीलदारांकडे नुकसानीचा अहवाल सादर केला.

# भक्ती, परंपरा आणि निसर्गरक्षणाचा खरा संगम

गणपती बाप्पा म्हंटलं की आपल्या डोळ्यासमोर उभा राहते ती हातात लाडू आणि पोट मोठं असलेली प्रतिमा. बाप्पा अवघ्या काही दिवसांतच आपल्या सर्वांच्या भेटीला येणार आहे. त्याच्या आगमनाची आस संपूर्ण पंचक्रोशीत लागली. बाप्पा घरी आला की वातावरण कसं अगदी प्रसन्न होऊन जातं. घरात असले नसलेले क्लेश दूर होतात आणि सर्वजण एकत्र येऊन बाप्पाला पूजतात. त्याची आराधना करतात. बाप्पा प्रत्येकाच्या आयुष्यात असलेलं विघ्न दूर करून आनंदी वातावरण निर्माण करतो. पण त्याच आनंदी वातावरणाला दूषित करण्याचं काम आपण करतो. अर्थ हाच की, गणपती बाप्पाला आपण आणतो तेव्हा आपण काय पाहतो? त्याचा रंग, रूप आणि त्याची रचना पाहतो. पण आपण एक गोष्ट विसरतो... ती म्हणजे मूर्ती शाडूच्या मातीची आहे की, पीओपीची (प्लास्टर ऑफ पॅरिस)... आता तुम्ही म्हणाल की, मूर्ती कशाची का बनलेली असेना बाप्पा बाप्पा असतो. पण असं योग्य आहे का?

--------------

ज्या सृष्टीची निर्मिती ज्याने केली आहे, तोच पर्यावरणाला हानिकारक होतोय असं म्हंटल तर... किती भयानक वाटत न ऐकायला. अहो मग आपण तेच तर करत आहोत ना... देवाने एवढ्या सुंदर निसगार्ची निर्मिती केली आहे. इथले जीव, जंतू या पृथ्वीची सुंदरता वाढवतात आणि आपण सणांच्या नावाखाली, सुंदर रूपाच्या आणि उंचीच्या नावाखाली गणपतीची मोठी मूर्ती बनवून गाजावाजा करतो मात्र हा विचार करत नाही की, ते पर्यावरणाला किती हानिकारक आहे.

पीओपी ही एक कृत्रिम रसायनमिश्रित पांढरी धूळ असून तिचा वापर मूर्ती बनवण्यासाठी केला जातो. ही धूळ पाण्यात मिसळल्यावर घट्ट होते आणि त्यावर हवे तसे आकार व रंग देता येतात. हेच गुण पाहता अनेक मूर्तिकार पीओपी वापरतात कारण ती स्वस्त असते, हलकी असते आणि लगेच तयार करता येते.

पण नेमकी हीच सोय प्रकृतीच्या अस्वस्थतेला कारणीभूत ठरते. पीओपी हा पदार्थ निसर्गात सहजपणे विघटित होत नाही. एकदा पीओपी पाण्यात मिसळून वाळवला की, तो फारच कठीण होतो आणि सहज विघटन होत नाही. जेव्हा पीओपी मूर्ती विसर्जनासाठी तलावात किंवा नदीत टाकली जाते, तेव्हा ती वर्षानुवर्षे तशीच राहते, विघटित होत नाही. यामुळे पाणथळ जागेचं नैसर्गिक संतुलन बिघडतं.

जेव्हा या मूर्तींचं विसर्जन तलावात, नद्या, समुद्र यामध्ये केलं जातं, तेव्हा त्या मूर्ती पाण्यात सहज विरघळत नाहीत. उलट त्या पाण्यात अडकून राहतात, तळाशी बसतात आणि तलावाचं स्वच्छ, नैसर्गिक रूप हळूहळू गमावतं. अशा मूर्तींवर वापरले जाणारे रंग आणि सजावटीसाठी वापरण्यात येणारे झिलमिल पदार्थ अनेक वेळा रासायनिक आणि विषारी असतात. यातून पाण्यात ींि (सीसा), ी१४१८ (पारा), ेंि आणि इतर धोकादायक धातू मिसळतात. यामुळे मासे, कासव, बेडूक यांचं अस्तित्व धोक्यात येतं. इतकंच नाही, तर या प्रदूषित पाण्याचा वापर जर शेतीसाठी किंवा प्यायच्या पाण्यासाठी झाला, तर माणसांच्या आरोग्यावरही याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे मोठा गणपती जरी आकर्षक वाटत असला तरी निसगार्साठी तो हानिकारक आहे. म्हणजेच काय तर एकीकडे आपण गणपती बाप्पाला "मंगलमूर्ती मोरया" म्हणत मोठ्या श्रद्धेने पूजतो, तर दुसरीकडे त्याची मूर्ती विसर्जित करताना आपणच निसर्गाचा अपमान करत असतो. बाप्पाचा उत्सव जितक्या भक्तीने साजरा होतो, तितक्याच निसर्गप्रेमाने तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हायला हवा.

शाडू माती ही एक नैसर्गिक आणि जैवविघटनशील माती असते. ती सहसा नदीकिनाऱ्यांवर किंवा तलावाजवळ सापडते आणि अतिशय मृदू, चिकटसर आणि सुलभपणे आकार घेणारी असते. त्यामुळे तिचा वापर मूर्ती बनवण्यासाठी अगदी योग्य मानला जातो. आज ज्या वेगाने ढडढ मूर्तींमुळे जलप्रदूषण होत आहे, त्याच्या तुलनेत शाडू माती ही पर्यावरणाशी एकरूप होणारी शांत, संयमित आणि संतुलित निवड आहे.

पीओपी मूर्तीच एकप्रकारे बाजारीकरणच झालं आहे. मोठमोठे मंडळं, स्पर्धा, लाइट्स, सजावट, सोशल मीडियावर व्हायरल होणारी आरास. यात मूर्ती एक उत्पादन बनते, उपास्य रूप राहात नाही. त्या स्पर्धेमध्ये कोणती मूर्ती मोठी, सुंदर, आकर्षक आहे याला जास्त महत्त्व दिलं जातं. मूर्ती कोणत्या भावनेतून बनवली गेली, तिच्या मागचं पर्यावरणीय दृष्टिकोन काय आहे, हे विचारलंही जात नाही आणि नाही त्याचा विचार केला जातो.

या सर्व गोष्टी लक्षात घेता शासनानेही काही ठिकाणी पीओपी मूर्तींवर बंदी आणलेली आहे, परंतु ती संपूर्णतः यशस्वी होण्यासाठी सामान्य लोकांना पुढाकार घ्यावा लागेल. सजावट, स्पर्धा, आकर्षण या सगळ्या गोष्टींमधून पर्यावरणाचं भान सुटू नये, याची काळजी घेणं हीच खरी निसर्गपूजा ठरेल. हे केवळ तलाव आणि नद्या प्रदूषित करणं नाहीये, तर आपल्या आध्यात्मिकतेचं आणि परंपरेचंही प्रदूषण आहे.

निसर्ग म्हणजेच बाप्पाचं मूळ रूप आहे. तो चराचरात वसलेला आहे. निसर्गात, जंगलात, पाण्यात, पक्षात मग आपणच त्याला झिरो ऑक्सिजन असलेल्या तलावात विसर्जित करून त्याचं अस्तित्व गुदमरत का टाकतो?

यावर मूर्तिकार 'मंगेश छत्रे' असं म्हणतात की, पीओपीच्या मूर्तीवर अनेक जणांचे पोट आधारलेलं आहे. अनेकांचा त्यामुळे उदरनिर्वाह होतो. तसेच पीओपीच्या मूर्ती बनवणं खूप सोपं असतं. त्याला मेहनत कमी लागते आणि वेळेचीही बचत होते.



तसेच साच्यात टाकल्या टाकल्या त्याला आपल्याला हवा तसा आकार दिला जातो. त्यामुळे पीओपीच्या मूर्ती घडवण्याचा आवाका वाढला आहे."

मनुष्य हा एक असा प्राणी असा आहे, जो नवनवीन गोष्टी आत्मसात तर करतो. मात्र, त्याचा पर्यावरणावर काय आणि कसा परिणाम होईल याचा विचार केला जात नाही. नकळतपणे तो अनेकांचा व्यवसाय बनतो आणि त्यांचं आयुष्य त्या गोष्टीशी जोडल्या जात.

शाडूच्या मातीची मूर्ती ही एक पारंपरिक संकल्पना तर आहेच पण त्याचबरोबर ती मातीतून बनते आणि मातीतच मिसळते. ही मूर्ती म्हणजे आपल्या मातीशी असलेली नाळ आहे. ती नाळ तोडून आपण जेव्हा केवळ बाह्य आकर्षणाच्या मागे धावतो ना, तेव्हा या गणेशोत्सवाचा आत्माच हरवतो.

गेल्या काही वर्षांत अनेक लोक पर्यावरणपूरक मूर्तींचं महत्त्व समजू लागले आहेत. काही शाळा आणि संस्था तर बीजगणेश नावाचा उपक्रमही चालवतात. जिथे मूर्तीमध्ये वृक्षाच्या बिया असतात आणि विसर्जनानंतर ती मूर्ती मातीमध्ये मिसळून झाड उगवतं. हाच तर खरा "संकटहर्ता" जो निसर्ग वाढवतो.

मूर्तिकार 'दिनेश तेंडुलकर' म्हणतात, शाडूच्या मातीची मूर्ती बनवणं हे निसर्गासाठी एक आनंद आहे. मी व्यवसाय म्हणून या गोष्टी करत नाही तर, मी जेव्हा बाप्पाचे विसर्जन करायला गेलो होतो तेव्हा मी बाप्पाची विटंबना पहिली होती. ज्या बाप्पाची आपण सलग ११ दिवस मनोभावे सेवा करतो. त्याला १२ व्या दिवशी अस्ताव्यस्त अवस्थेत पाहतो. तेव्हाच ठरवलं की, आपण नैसर्गिक पद्धतीने मूर्ती बनवायची आणि पर्यावरणाला हातभार लावायचा.

गणेशोत्सव ही आपल्या संस्कृतीतील एक अनमोल परंपरा. हर्षोल्हासाने साजरा होणारा हा उत्सव फक्त धमार्चा भाग नाही, तर समाज, कुटुंब आणि निसर्ग यांच्यातील एक सेंद्रिय नातं आहे. या नात्याचा केंद्रबिंदू म्हणजे गणपती बाप्पा ज्याच्या रूपात आपण विघ्नहर्ता पाहतो, पण त्याचवेळी त्याला मातीच्या मुळाशी जोडलेलं एक रूप म्हणूनही ओळखतो. त्यामुळेच गणेशमूर्ती ही शाडू मातीपासून बनलेली असणं अधिक अर्थपूर्ण ठरतं.

शाडू माती ही एक नैसर्गिक आणि जैवविघटनशील माती असते. ती सहसा नदीकिनाऱ्यांवर किंवा तलावाजवळ सापडते आणि अतिशय मृदू, चिकटसर आणि सुलभपणे आकार घेणारी असते. त्यामुळे तिचा वापर मूर्ती बनवण्यासाठी अगदी योग्य मानला जातो.

पीओपीची मूर्ती बनवणं जेवढं सोपं आहे, त्याचप्रमाणे तिला हाताळणंही सोपं आहे. त्याउलट जर आपण शाडूच्या मूर्तीबद्दल विचार केला तर ती बनवण्यासाठी वेळ, श्रम खूप जास्त लागते. कारण ही माती हवा तसा आकार घेते मात्र, ती जेव्हा बनवून तयार होते तेव्हा तिला हाताळणं थोडस अवघड जात. त्यामुळे अनेकजण या कारणामुळे म्हणतात की, पीओपीची मूर्ती योग्य वाटते.

मात्र असे असलं तरी पर्यावरणाचा विचार करणं तितकंच गरजेचं आहे. आज ज्या वेगाने पीओपी मूर्तींमुळे जलप्रदूषण होत आहे, त्याच्या तुलनेत शाडू माती ही पर्यावरणाशी एकरूप होणारी शांत, संयमित आणि संतुलित निवड आहे.

शाडू मातीपासून बनवलेली मूर्ती पाण्यात सहज विरघळते. त्यामुळे विसर्जनाच्या वेळी पाण्यात कोणतेही रासायनिक द्रव्य, धातू, किंवा रंग मिसळत नाहीत. या मूर्तींचं विघटन काही तासांत होऊन जाते आणि त्यामुळे तलाव, नद्या यांचं प्रदूषण होण्याचा धोका टळतो. शाडू मातीमुळे जलचर प्राण्यांचं जीवन धोक्यात येत नाही आणि त्यामुळे संपूर्ण जैविक परिसंस्था सुरक्षित राहते.

याशिवाय, शाडू मातीचा वापर केल्यामुळे मूर्ती तयार करताना मूर्तिकारांमध्येही एक प्रकारची सर्जनशीलता आणि संयम टिकून राहते. पीओपी इतकी पटकन तयार होत नसल्यामुळे शाडू मातीची मूर्ती बनवताना वेळ लागतो, काळजी घ्यावी लागते आणि हीच प्रक्रिया भक्तिभाव वाढवते.

बाप्पा म्हणजे गती, पण ती गती निसर्गाशी जुळवून घ्यावी लागते, हे शाडू माती शिकवते. एक विशेष गोष्ट म्हणजे, शाडू मातीच्या मूर्तीवर वापरले जाणारे रंगसुद्धा जर नैसर्गिक असतील (हळद, गेरू, फुलांची पूड इत्यादी), तर ती मूर्ती पूर्णतः पर्यावरणस्नेही ठरते. अशा मूर्ती विसर्जनानंतरही कोणतेही पदार्थ उरवत नाहीत आणि निसर्गाला नवी ऊर्जा देतात.

या मूर्तींचा आणखी एक सकारात्मक पैलू म्हणजे घरीच विसर्जन करणे. छोट्या टाकीत, पितळी बादलीत किंवा कुंडीतही ही मूर्ती सहज विरघळते. त्यामुळे सार्वजनिक जलस्त्रोतांवरील ताण कमी होतो. काही लोक तर शाडू मातीच्या मूर्तींच्या विसर्जनानंतर उरलेली माती कुंडीत झाडांना घालतात आणि तिथून एक नवं जीवन चक्र सुरू होतं.

गणपती बाप्पा शारीरिक दृष्ट्या आपल्याला सोडून जातो मात्र तो झाडाच्या रूपात आपल्या सोबतीला कायम राहतो. शाडू माती ही केवळ मूर्ती बनवण्याचं माध्यम नाही, तर ती एक प्रकृतीशी नातं टिकवण्याची प्रक्रिया आहे. ती आपल्याला आठवतं ठेवते की गणेशोत्सव ही फक्त दहा दिवसांची सजावट नाही, तर एक शाश्वत मूल्य आहे. जिथे भक्ती, कला आणि पर्यावरण यांचा संगम होतो.

गरज केवळ पाण्याच्या शुद्धतेची नाही, तर आपली विचारधारा शुद्ध करण्याची आहे. फक्त शासकीय आदेश आणि नियम यावर विसंबून चालणार नाही. ही जबाबदारी आपली आहे, आपल्या घरातील पहिल्या आरतीपासून ते विसर्जनाच्या शेवटच्या टाळीपर्यंत.

गणेशोत्सव ही एक जबाबदारीची पूजा असायला हवी. कारण उत्सव संपतो, आरास हटते, पण निसर्गावर उमटलेला घाव मात्र वर्षानुवर्षे राहतो. त्या घावांचा परिणाम आपण पाहतो. पाण्याची गुणवत्ता घसरते, मासेमारी कमी होते, नदी-तलाव मृतप्राय होतात आणि अखेर आपल्या भविष्यात अंधार दाटतो.

आज जर आपण पीओपी मूर्ती नाकारली, तर उद्या आपल्या मुलांना शुद्ध पाणी, हरित निसर्ग आणि सुरक्षित पर्यावरण मिळेल. हीच आपली खरी गणेशभक्ती ठरेल.

■ ■ ■

## ईडीने हैद्राबाद येथील धाडीत जप्त केलेल्या सोन्याबद्दल उच्च न्यायालयाने काय सांगितले?

पूर्वी गावात इन्कमटॅक्सचे निरीक्षकसुद्धा सर्वे करत किंवा चौकशी करायला आले तर संपूर्ण बाजाराची दुकाने एक-एक करून लगेच बाजारच बंद व्हायचा, हे आजही जुन्या वाचकांना हे आठवत असेल. आज जरी ऑनलाईनचा जमाना आला तरी, इन्कमटॅक्सची घबराट करदात्याच्या मनात असतेच.

आज आपण नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात सोन्याबद्दलची अधिक माहिती जाणून घेणार आहोत.

**प्रश्न :** इडीने टाकलेल्या धाडबद्दल तेलंगाना उच्च न्यायालयाने काय सांगितले?

■ यासाठी आपल्याला Additional Director ५/२ मुसद्दीलाल जेम्स अँण्ड ज्वेलर्स इंडिया (प्रा) लिमिटेड [2023] 151 Taxmann.com 380 (Telangana) या केसची माहिती जाणून घ्यावी लागेल.

या केसमध्ये याचिकाकर्ता मुसद्दीलाल जेम्स यांनी मा. तेलंगाना उच्च न्यायालयात याचिका दाखल केली की,

त्यांच्याकडे ए.ऊ डिपार्टमेंटने 17-10-2022 रोजी सर्च अँण्ड सीझर म्हणजे धाड टाकली. त्यावेळी त्यांनी (प्रिवेन्शन ऑफ मनी लॉन्ड्रीग अॅक्ट) मनी लॉन्ड्रीग प्रतिबंधक कायद्याप्रमाणे जो पंचनामा केला, तो याच कायद्याच्या कलम 17 च्या विरोधात केला गेला. PMLA च्या कलम 17(1) प्रमाणे Reasons to Believe म्हणजे (विश्वास ठेवण्या योग्य कारण) असल्याशिवाय धाड टाकता येत नाही, असे स्पष्ट सांगितले. त्यांनी PMLA कायद्याच्या कलम 17(1) आणि 17(1अ) चे सविस्तर उहापोह केला.

या केसमध्ये मुसद्दीलाल ज्वेल या कंपनीच्या कार्यालयात तथा घरी आणि प्रतिवादी नं. 2 ते 4 या सर्वांच्या येथे सुद्धा धाड टाकण्यात आली व संपूर्ण कॅश/ज्वेलरी आणि इतर मौलिक वस्तू जप्त करण्यात आल्या. हायकोर्टने निर्णय देतांना सांगितले की, सर्व जप्ती मनी लॉन्ड्रीग प्रतिबंधक कायद्याच्या कलम 17 च्या उलट असून, त्यांनी Prevention of money Laundering कायदा 2002 ची जणूकाही व्याख्याच केली. प्रतिवादीलाही सर्व धाडीत सापडलेली कॅश/ज्वेलरी व इतर मौल्यवान वस्तू परत करण्याचे आदेश दिले.

या केसची माहिती अशी की ईडीने धाड टाकली असता त्यांच्या अशा लक्षात आले की 111 कोटी रुपये 2016 च्या नोटा बंदी योजनेत मुसद्दीलाल यांनी बँकेत रोख जमा केले होते. रोख व ज्वेलरी तथा इतर मौल्यवान वस्तू मिळून 150 कोटीचे घबाड सापडल्यामुळे त्यांनी सर्व 150 कोटी जप्त केले होते.





या धाडी हैद्राबाद व विजयवाडा येथे मुसद्दीलालच्या पूर्ण ग्रुपवर टाकण्यात आल्या. धाडीमध्ये डिपार्टमेंटला 149.10 कोटीची ज्वेलरी व 1 कोटी 96 लक्ष रुपये रोख सापडले होते, जे जप्त करण्यात आले होते. या शिवाय डिपार्टमेंटचे न्यायालयात म्हणणे होते की, मुसद्दीलाल यांनी बोगस नावांच्या खाली वेगवेगळ्या नोटा बँकेत नोटाबंदी योजनेखाली जमा केलेल्या आहेत. इतकेच नाही तर कंपनीचे संचालक सुकेश गुप्ता यांना अरेस्टही करण्यात आले होते. कोर्टाच्या आदेशानंतर सर्व रोख, स्टेट बँकच्या F.D. तथा मौल्यवान वस्तू परत करण्यात आल्या.

पुढील लेखमालेत आपण असेच आणखी विविध न्यायालयांचे सोन्याच्या धाडीबद्दलच्या केसेस जाणून घेणार आहोत. ज्या वाचकांना इन्कमटॅक्ससंबंधी काही प्रश्न विचारायचे असतील त्यांनी 9422218428 या नंबरवर पूर्ण नावासह व्हॉटस्अॅप करावे, म्हणजे त्यांची उत्तरे लेखमालेत निःशुल्क देण्यात येतील.

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

■ ■ ■

## शेतकऱ्यांची कर्ज मुक्ती कधी?

"जय जवान, जय किसान" हा नारा आपण अनेक वर्षांपासून ऐकत आलो आहोत. जवान देशाची सीमा राखतो तर शेतकरी आपल्या देशवासियांची भूक मिटवतो. दोघेही राष्ट्राचे खरे आधारस्तंभ आहेत. मात्र, या घोषवाक्याचा आत्मा जपला गेला का? विशेषतः शेतकऱ्याच्या बाबतीत.

सध्याच्या परिस्थितीकडे नजर टाकली, तर उत्तर स्पष्ट आहे? नाही. शेतकरी हा आजही कर्जाच्या जाळ्यात अडकलेला आहे, आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि त्याच्या समस्या केवळ राजकीय भाषणांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत.

२०२५ विधानसभा निवडणुकीत अपक्ष आमदार बच्चू कडू यांचा पराभव झाला असला तरी, त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपली निष्ठा कायम ठेवली आहे. आपल्या पदाचा वापर किंवा गमावलेली सत्ता यापलीकडे जाऊन त्यांनी शेतकऱ्यांसाठी आंदोलनाची मालिका सुरूच ठेवली आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते, सत्ता नसली तरी लढण्याची जिद्द हवी आणि ती बच्चू कडू यांनी दाखवून दिली आहे.

राज्यातील सत्ताधारी भाजप आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणुकीच्या आधी शेतकऱ्यांना अनेक आश्वासने दिली होती. त्यात सातबारा "कोरा" करण्याचे आश्वासन आघाडीवर होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी स्पष्टपणे म्हटले होते की, "आमचे सरकार आल्यावर सातबारा कोरा करू." मात्र निवडणुकीनंतर सहा महिने उलटले तरीही कर्जमाफीच्या दिशेने कोणतेही ठोस पाऊल उचलले गेलेले नाही.

दुष्काळजन्य परिस्थिती नसल्याचे कारण पुढे करत सरकारने कर्जमाफीबाबत सावध भूमिका घेतली आहे. फडणवीस यांचे म्हणणे आहे की, सध्या परिस्थिती चांगली आहे, आणि जर दुष्काळ उद्भवला तर त्यावेळी शेतकऱ्यांना अधिक मदतीची गरज असेल. त्यामुळे कर्जमाफीचा योग्य काळ पुढे येईल असा त्यांचा संकेत आहे. मात्र, शेतकऱ्याच्या व्यथेला विलंबित मदत उपयोगाची नसते झ ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मार्च महिन्याच्या आधी शेतकऱ्यांनी आपले कर्ज नियमित करावे, असे आवाहन केले होते. या आवाहनानंतर हजारो शेतकऱ्यांनी आपल्या घरातलं दाग-दागिने, शेतीच्या साधनसामग्री गहाण ठेवून कर्जाची परतफेड केली. मात्र, त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कर्जमाफीसाठी काही निकष लावले जाणार असल्याचे जाहीर केले. या निकषांमध्ये शेतकऱ्यांची वर्गवारी केली जाणार आहे. आर्थिक स्थिती, मालमत्ता, क्षेत्रफळ याच्या आधारे त्यांना कर्जमाफीसाठी पात्र ठरवले जाईल. ही प्रक्रिया अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक ठरते.

जे शेतकरी अतिशय हालअपेष्टा सहन करून कर्ज भरतात, त्यांना पुढे नवीन कर्ज घेणेही शक्य होत नाही. कारण, त्यांच्या नावावर पूर्वीची कर्जमाफी लागू होत नाही आणि नवीन कजार्साठी पात्रता उरलेली नसते. हे दुष्टचक्र मोडण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.

कर्जमाफीच्या मुद्द्यावर बच्चू कडू यांनी केलेली आंदोलने ही केवळ आक्रमक नव्हती, तर सर्जनशील देखील होती. आमदार यांच्या घरासमोर टेंभा आंदोलन, डफळी बजाव आंदोलन, ८ दिवसांचे अन्नत्याग, पायदळ यात्रा, मुख्यमंत्री व पंतप्रधानांना राखी बांधणे, लेटर आंदोलन, संदेश आंदोलन, आणि गावागावांत "सातबारा कोरा करणार" हे भित्तीचित्र आंदोलन झ यामुळे शेतकऱ्यांच्या व्यथा जनतेपर्यंत पोहोचल्या.

हे आंदोलन इतके प्रभावी ठरले की, सर्वपक्षीय पाठिंबा मिळाला. शेतकरी देखील स्वतःहून सहभागी होऊ लागले. यातून एक गोष्ट स्पष्ट झाली, शेतकरी अजूनही संघषार्साठी तयार आहे, फक्त त्याला योग्य दिशा आणि नेतृत्व हवे.

बच्चू कडू यांच्या अन्नत्यागानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंधरा दिवसांत समिती गठीत करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, आधी समिती गठीत करण्यासाठी विलंब त्यात समिती गठीत होऊन एका महिन्याचा कालावधी उलटूनही समितीचे काम कुठे पोहचले आहे याची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. या प्रकारामुळे सरकारच्या गंभीरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

सौ. अश्विनी डकरे
९९७५८४४६३८

येत्या जिल्हा परिषद आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांचा प्रश्न केंद्रस्थानी असणार हे निश्चित. यामुळेच चर्चेला उधाण आले आहे की, निवडणुका जवळ येताच सरकार पुन्हा तात्पुरत्या स्वरूपात कर्जमाफी जाहीर करणार का?

सरकारकडून कर्जमाफीचा विषय जाणीवपूर्वक लांबवण्यात येतोय का, हा शंका अनेकांना वाटू लागली आहे. यामागील कारण म्हणजे, कर्जमाफीचे श्रेय बच्चू कडूंना मिळू नये ही सत्ताधाऱ्यांची भीती. मात्र, या राजकीय श्रेयवादामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे हे विसरले जात आहे. आंदोलन करणारा नेता हिरो होतो म्हणून जर निर्णय लांबवले जात असतील, तर ती लोकशाहीची विटंबना आहे.

जेव्हा उद्योगपतींच्या कर्जमाफीत कोणतेही निकष लागत नाहीत, त्या वेळी शेतकऱ्यांसाठी इतके नियम आणि अटी का? शेतकरी देशासाठी उत्पादन करतो, परिश्रम करतो, जीव गमावतो. मग त्याच्यावर एवढा अन्याय का?

शेतकऱ्यांची आत्महत्या ही केवळ वैयक्तिक घटना नाही, ती संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित करते. म्हणून शेतकऱ्याला निकषांविना, सन्मानपूर्वक आणि स्थायिक स्वरूपात कर्जमुक्ती देणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

कर्जमाफी ही एक अल्पकालीन उपाययोजना आहे. खरी गरज आहे, शेतकऱ्याच्या उत्पन्नाला शाश्वत स्थैर्य देण्याची. यासाठी खालील गोष्टी तातडीने राबवणे गरजेचे आहेः

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींचे पूर्ण पालन.
उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देणे.
मध्यम व अल्पभूधारक शेतकऱ्यांना विशेष योजना
रोजगार हमी योजनेचा विस्तार ग्रामीण भागात
शेतीपूरक उद्योगांना चालना देणे
शेतीसाठी व्याजमुक्त किंवा अल्पदरातील कर्जयोजना
नवीन तंत्रज्ञान, सिंचन साधने सुलभ करणे
शेतकऱ्यांच्या विमा योजनांचा प्रभावी अंमल
पीक विमा योजनेत पारदर्शकता

**शेतकरी वाचला तरच राष्ट्र वाचेल**

शेवटी, हा प्रश्न केवळ एका आंदोलनाचा, एका आमदाराचा, एका सरकारचा नाही. हा प्रश्न आहे भारताच्या मूलभूत अस्तित्वाचा. शेतकरी जगला तरच आपण जगू. अन्यथा, शेती ही व्यवसाय राहणार नाही, तर एक दुःस्वप्न बनून राहील.

राजकारणी येतात आणि जातात, परंतु शेतकरी कायमस्वरूपी देशाच्या अन्नसाखळीत कार्यरत असतो. त्यामुळे त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

■ ■ ■

## पोळा : बैलांप्रती कृतज्ञतेचा दिवस!

**वाचक लिहितात**

महाराष्ट्रात पोळा श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो. बैलांचा उत्सव म्हणजे पोळा! बैल हा शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सोबती! कारण नांगरणीपासून ते पेरणी, दळणवळण यासाठी बैल शेतकऱ्याला मदत करतो. त्याच्या श्रमामुळेच शेतकऱ्याला पीक घेता येते. म्हणूनच बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची पूजा करून हा सण साजरा केला जातो.



या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना आंघोळ घालून, त्यांना तेल चोळून, सुंदर सजवून मिरवणुकीसाठी नेतात. बैलांच्या शिंगांना रंगवून, गळ्यात गजरे व गोंडे घालून, गोड पदार्थ खाऊ घालून त्यांचा सन्मान केला जातो. या दिवशी बैलांना कामावर लावले जात नाही. बैलांनी केलेल्या कष्टाचे स्मरण करून त्यांची पूजा केली जाते.

या दिवशी गावोगावी बैलांच्या मिरवणुका काढल्या जातात. शेतकरी बांधव एकत्र येऊन आनंदाने हा उत्सव साजरा करतात.

एकंदरीतच पोळा हा शेतकऱ्याच्या कष्टकरी बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, निसगार्ची पूजा करण्याचा आणि समाजात एकोपा वाढविण्याचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून प्राण्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित होते.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा

## भारतात डायबिटीजचा वाढता धोका १० पैकी ४ जणांना समस्या



आपल्या देशात अनेक आजारात शरीरात गुपचुप शिरकाव करीत हळूहळू तेथे बस्तान मांडत आपले आरोग्य संकटात आणत आहेत. डायबिटीज देखील त्यापैकी एक आहे. अनेक लोक यास गांभीयार्ने घेत नाहीत. नंतर मोठी समस्या बनल्यानंतर त्याकडे त्यांचे लक्ष जाते. अलिकडेच लॅन्सेटमध्ये प्रकाशित एका अभ्यासात आश्चर्यकारक खुलासा झाला आहे. भारतातील १० पैकी ४ जणांना त्यांना डायबिटीज असल्याचे माहिती नसल्याचे उघडकीस आले आहे.

हा अभ्यास २०१७ ते २०१९ दरम्यान ४५ हून अधिक वयोगटाच्या व्यक्तींवर करण्यात आला.यात आढळले की या वयोगटातील २० टक्के लोक डायबिटीजने पीडीत आहे.

पुरुष आणि महिला, दोघांमध्ये याचे प्रमाण जवळपास सारखे आहे. अभ्यासात हे देखील पुढे आले आहे की शहरी भागात डायबिटीजच्या रुग्णांची संख्या ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. याचे कारण जीवनशैली, खाण्याच्या सवयी आणि शारीरिक हालचालींची कमतरता मानले जात आहे.

**भारतात डायबिटीजची गंभीर स्थिती**

भारतात २० ते ७९ वयोगटातील व्यक्तींमध्ये डायबिटीजच्या रुग्णांची संख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.२०१९ मध्ये भारतात झालेल्या एकूण मृत्यूमध्ये सुमारे ३ टक्के मृत्यू डायबिटीजने झाले आहेत. याच बरोबर उच्च रक्तदाबाच्या रुग्णांची संख्या देखील वेगाने वाढत आहे.

दोन्ही आजार जर वेळीच ओळखून नियंत्रित केले नाही तर ते हृदय, किडनी आणि डोळ्यांच्या गंभीर समस्येचे कारण बनू शकतात.

**गावात उपचाराची अनुपलब्धता**

अभ्यासात असे उघड झाले आहे की भारताच्या ग्रामीण क्षेत्रात डायबिटीज आणि हायब्लडप्रेशरच्या उपचाराची सुविधा खूपच कमजोर आहे. क्लटफ आणि हल्ड द्वारा सात राज्यांच्या १९ जिन्ह्यात केलेल्या सर्वेक्षणात कळाले की केवळ ४० टक्के सब-सेंटर्स या आजारांवर उपचारासाठी तयार आहेत.

एक तृतीयांश केंद्रात डायबिटीजचे औषध मेटफॉर्मिन उपलब्ध नव्हते. जवळपास अर्ध्या केंद्रांवर ( ४५ टक्के ) उच्च रक्तदाबावरील एम्लोडिपिन औषधांचा कमतरता

**अटकाव आणि वेळीच निदान गरजेचे**

डायबिटीज आणि हायब्लड प्रेशर दोन्ही असे आजार आहेत. ज्यात वेळेत निदान आणि योग्य औषध घेतले तरच तो नियंत्रणात येतो. सुरुवातीचे निदान, संतलित आहार, नियमित व्यायाम आणि वेळेवर औषधे घेतली तरच या आजारात होणाऱ्या गंभीर नुकसानाला रोखता येते.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## गीता सार

गीताग्रंथ घ्यावा
डोक्यामधी
होईल जीवनाचे
सार्थक
जयहो म्हणूनी
घेणे डोक्यावर
आहे केवळ निरर्थक..

कर्मफलाच्या सिंद्धाताची
हीच आहे शिकवणी
तरच उर्वरीत आयुष्यात
बसेल जीवनाला
कलाटणी...

# आचार्य विनोबा भावे ग्रामीण हॉस्पिटलमध्ये कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्राम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी वरदान



**यवतमाळ, १७ ऑगस्ट :** सावंगी येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण हॉस्पिटल (एव्हीबीआरएच) मधील, कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्रामने ३० जुलै २०२५ रोजी आणखी एक मोठे यश मिळवले. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत आणखी दोन मुलांना ऐकण्याची देणगी मिळाली.

यामध्ये वाशीम येथील दोन वर्षांची अर्वी नरवडे आणि यवतमाळ येथील दोन वर्षांची रुतुजा फुलतनकर या दोन्ही मुलांचा समावेश आहे. त्यांना गंभीर श्रवणबाधा असल्याचे निदान झाले होते. संपूर्ण श्रवण चाचणी (ऑडीओलॉजिकल )आणि वैद्यकीय तपासणीनंतर त्यांची कॉक्लिअर इम्प्लांटसाठी निवड करण्यात आली. ही शस्त्रक्रिया डॉ. श्रद्धा जैन, प्रोफेसर आणि डिपार्टमेंट ऑफ ओटोरायनोलेरिंगॉलॉजीच्या प्रमुख यांच्या नेतृत्वाखालील समर्पित ईएनटी टीमने केली, ज्यांना डॉ. जयश्री सेन यांच्या नेतृत्वाखालील ॲनस्थेसियोलॉजी टीम आणि डॉ. अशिष दिसवाल यांच्या नेतृत्वाखालील ऑडिओलॉजी टीमने साथ दिली. शस्त्रक्रिया सुरळीत पार पडली आणि दोन्ही मुले आता शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्वसनामुळे बोलणे आणि संवाद कौशल्ये विकसित करण्याच्या मार्गावर आहेत.

या प्रोग्रामअंतर्गत आतापर्यंत एकूण १३ यशस्वी कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया पूर्ण झाल्या असून, आचार्य विनोबा भावे ग्रामीण हॉस्पिटल हे प्रगत श्रवण उपचारासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जात आहे. हा प्रोग्राम ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करतो, जेणेकरून आवाज ऐकण्याची संधी भौगोलिक किंवा आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहणार नाही.

कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्राम आणि त्याच्या समर्पित टीमने दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च टीमच्या सातत्यपूर्ण पाठबळासाठी आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासाठी मनापासून आभार मानले. ईएनटी उपचारात नाविन्यपूर्ण उपक्रम आणणे आणि लहानपणीच लवकर ऐकण्याच्या उपचाराला प्राधान्य देणे या गोष्टींमुळे हा प्रोग्राम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी आशेचा किरण ठरला आहे. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यातील अलीकडील सहकार्यामुळे कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्राममध्ये अधिक प्रगती होण्याची आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील श्रवणदोष असलेल्या मुलांपर्यंत सेवा पोहोचवण्याची अपेक्षा आहे, जेणेकरून प्रत्येक मूल ऐकू शकेल, बोलू शकेल आणि त्यांना प्रगती करण्याची संधी मिळेल.

# अदाणी डिजिटल लॅब्सने एअरपोर्ट आणि प्रवासाचा अनुभव सुधारण्यासाठी मोठे बदल

**अहमदाबाद, १७ ऑगस्ट :** अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडची टेक्नॉलॉजी शाखा अदाणी डिजिटल लॅब्स (एडीएल) ने अनेक मोठे बदल जाहीर केले आहेत. यामध्ये देशभरातील अदाणी व्यवस्थापित एअरपोर्टवर प्रवाशांचा अनुभव अधिक सोयीस्कर, आरामदायक आणि आनंददायी करण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमामुळे अदाणी एअरपोर्ट्स एव्हिएशन सेक्टरमध्ये डिजिटल इनोव्हेशनमध्ये आघाडीवर राहतील आणि नव्या रुपातील वनॲप व डिजिटल लाउंज एअरपोर्ट हॉस्पिटॅलिटीमध्ये नवीन मापदंड निर्माण करतील.

अदाणी डिजिटल लॅब्सच्या संचालिका सृष्टि अदाणी म्हणाल्या, नवीन एडीएल टीममध्ये ऊर्जा, नवे विचार आणि उत्तम अनुभव यांचा समावेश असेल. प्रवाशांना डिजिटल-फर्स्ट अनुभव देण्याच्या आमच्या मोठ्या योजनेचा हा पहिला टप्पा आहे. प्रत्येक प्रोजेक्टमध्ये आमचे उद्दिष्ट प्रवाशांच्या प्रवासातील अडचणी कमी करणे आहे. यात रिअल-टाइम माहिती, आकर्षक रिवॉर्ड्स आणि खास लाउंज सेवा असतील, ज्या नेहमीच्या सोयींपेक्षा जास्त सुविधा देतील आणि प्रत्येक प्रवाशाला वैयक्तिक अनुभव देतील. त्यामुळे आमच्या एअरपोर्टवर प्रवास करणे आनंददायी होईल.

विकास आणि इनोव्हेशनबद्दलची आपली वचनबद्धता दाखवत एडीएलने अहमदाबादमध्ये १५० सीट्सचे नवे ऑफिस सुरू केले आहे. इथून टीम प्रवाशांच्या सोयीसाठी कस्टमर-सेंट्रिक सोल्यूशन्स तयार करेल. हे सोल्यूशन्स प्रवासादरम्यान वेळेची कमतरता, सुविधा माहिती न मिळणे आणि लांब रांगा यांसारख्या अडचणी दूर करतील. सर्व सेवा एका डिजिटल प्लॅटफॉर्मवर म्हणजेच अदाणी वनॲप वर उपलब्ध करून, प्रवासाचा अनुभव केवळ व्यवहारापुरता न ठेवता तो अधिक वैयक्तिक, सोपा आणि परिणामकारक केला जाईल.

# ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पंजाब नॅशनल बँकेने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न





**नागपूर, १७ ऑगस्ट :** १५ ऑगस्ट रोजी ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विभागीय कार्यालय, नागपूरने स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय दिलीप कुमार काप्री, विभागीय प्रमुख, पंजाब नॅशनल बँक, विभागीय कार्यालय, नागपूर यांनी ध्वजारोहण करून केले. याप्रसंगी दिलीप कुमार काप्री, उपविभागीय प्रमुख, शैलेंद्र गुप्ता, मुख्य व्यवस्थापक, शाखा कार्यालय, किंग्सवे यांनी पीएनबी विभागीय कार्यालयाच्या आवारात एक रोप लावले आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. उपविभागीय प्रमुख शैलेंद्र गुप्ता म्हणाले की, आपल्या भावी पिढ्यांना स्वच्छ वातावरण देण्यासाठी आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी सर्व नागरिकांनी एक झाड लावले पाहिजे. पंजाब नॅशनल बँक नेहमीच पर्यावरण संतुलनासाठी वचनबद्ध आहे. यापूर्वी देखील एपीएमसी कळमना येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये पीएनबीने ५०० हून अधिक रोपे लावून हिरवे वातावरण, स्वच्छ पर्यावरणाचा संदेश दिला होता. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात बोलताना श्री दिलीप कुमार काप्री जी म्हणाले की, या वर्षाची थीम 'नवीन भारत' आहे. या थीमचा उद्देश २०४७ पर्यंत समृद्ध, सुरक्षित आणि स्वावलंबी भारत निर्माण करण्याचा संकल्प बळकट करणे आहे. हे सरकारच्या विकसित भारत व्हिजन चे प्रतीक आहे, जे प्रत्येक नागरिकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यावर भर देते. ते म्हणाले की, आजचा दिवस आपल्याला एकत्र येऊन आपल्या देशाप्रती असलेली आपली कर्तव्ये पूर्ण करण्यास प्रेरित करतो. आपण आपला सांस्कृतिक वारसा, आपली मूल्ये आणि आपले आदर्श यांचे रक्षण करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. स्वातंत्र्यदिनी, आपण सर्वांनी अशी प्रतिज्ञा करूया की आपण आपल्या देशाला प्रत्येक क्षेत्रात पुढे नेण्यासाठी आणि त्याच्या प्रगतीत सक्रिय भूमिका बजावण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध राहू. आपण मातृभूमीप्रती असलेली आपली कर्तव्ये देखील लक्षात ठेवली पाहिजेत. आपण अशी प्रतिज्ञा करूया की आपण आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्वप्नांचा भारत, समृद्ध, शक्तिशाली आणि जगाच्या आघाडीवर असलेला भारत निर्माण करू. आपल्या समाजाच्या आणि देशाच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न करणे आणि आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडणे हे आपले कर्तव्य आहे. स्वातंत्र्यदिनी, कर्मचाऱ्यांनी रंगारंग कार्यक्रम सादर केला आणि स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री. दिलीप कुमार कापरी जी यांनी आयोजित केलेल्या ऑनलाइन राजभाषा आणि सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे आणि बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजभाषाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. नवीन जाधव यांनी केले.

# ३१ ला आकाश आनंद मुंबईत संघटन समीक्षा व प्रशिक्षण शिबिर घेणार

**नागपूर, १७ ऑगस्ट :** बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा बहन मायावतीजी यांचे उत्तराधिकारी व बसपाचे राष्ट्रीय कोऑर्डीनेटर आकाश आनंद हे ३१ ऑगस्ट रोजी मुंबईत येणार असून महाराष्ट्र प्रदेश बसपाची संघटन समीक्षा घेऊन राज्यातील बसपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणार आहेत.

मुंबईच्या चर्चगेट जवळील के सी कॉलेज ऑडिटोरियम मध्ये दिवसभर होणाऱ्या संघटन समीक्षा व प्रशिक्षण शिबिराला आकाश आनंद सोबतच प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यसभा खासदार व महाराष्ट्र प्रदेश प्रभारी राजारामजी, प्रदेशाध्यक्ष एड सुनील डोंगरे, स्थानिक प्रदेश प्रभारी डॉ संतोष शिंदे, डॉ रामचंद्र जाधव प्रामुख्याने उपस्थित राहतील.

या ऐतिहासिक प्रशिक्षण शिबिराला प्रदेश, झोन, जिल्हा, विधानसभा, सेक्टर स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले आहे.



# मी असा कसा...?

ज्येष्ठ पटकथा व संवाद लेखक सलीम खान यांचा एक व्हिडिओ मागे पाहण्यात आला होता. त्यात ते हातरुमालाच्या आधारे मानवी जीवन समजावून सांगत होते. ते म्हणत होते, जीवन म्हणजे या रुमालाचे दोन टोकं आहेत, ज्यातील एक टोक सुरुवात तर एक टोक शेवट आहे. ना सुरुवात (जन्म) आपल्या हाती आहे न शेवट (मृत्यू), मग मधले जे थोडेसेच आहे त्याचा काय एवढा घमंड करायचा. हे जरी एक छोटेसे उदाहरण वाटत असले तरी त्यात जीवनाची पूर्ण पटकथा आहे जी आपल्याला दिसूनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आणि पाहता-पाहता अंतिम छोर कधी येऊन सुटतो हेच कळत नाही. माणूस असेपर्यंत त्याची किंमत अन त्याचे अस्तित्व असते. तो गेल्यानंतर मोठं मोठ्यांना लोकं विसरतात तिथे सर्वसामान्य अतिसामान्य होऊन जातात. तरीसुद्धा या नश्वर जीवनाचा अंत माहिती असताना आणि तो कधीही येईल याची काहीच शाश्वती नसताना आम्ही मात्र असे वावरतो जसे काही हा जन्म कधी संपणारच नाही. अगदी आयुष्याचा शेवटचा पाडाव चालू असणारे देखील असे नियोजन करत राहतात जसे आणखी चार- दोन दशके ते जगतील. मग त्यासाठी किती जणांना दुखावले हे पाहत बसत नाहीत. या गुरफटण्यात मृत्यू कधी आला ते पण कळत नाही. खरे पाहयाला गेले तर मेल्यानंतर माणूस एक निर्जीव वस्तू आहे.

निसर्गातला शून्य मूल्य असलेला दगडाहून कमी महत्वाचा एक निर्जीव अंश. त्यामुळे तो जोपर्यंत बोलतो तोपर्यंत आपला. बोलणारी जिव्हा आटली की तो निसर्गाचा. मुळात आपण आहोतच त्या निसर्गातले आणि जाणारही तिथेच. पण इथे आल्यावर जी भौतिक सुखाची गरमी आता घुसते ती मरेपर्यंत काही बाहेर निघत नाही.

या जीवनात सर्वच परिमाणे आहेत. काही तोलून मापून आहेत तर काही अस्ताव्यस्त. या परिमाणात सकारात्मक आणि नकारात्मक दोन्हीही तितकेच. यातला जर सर्वात जास्त अन नाहक असेल तर तो अवास्तव घमंडाचा टक्का आहे. चार पैसे जवळ येवो की मिळालेली थोडीशी प्रतिष्ठा अन पद, लोकं जमीन सोडायला अन उडायला तत्परच असतात. ज्यांच्या जीवावर आणि ज्यांच्या कसरतीने हे जे उडले त्यांनाच हे पाण्यात पाहायला लागतात. आपण ज्यांच्यामुळे आहोत आणि ज्यांचा अभिमान आहोत त्यांनाच का कमी लेखायचे? हे न कळणारे असे कित्येक बेअक्कली याच समाजात आहेत. मुळात ते भूषण म्हणून तुम्हाला सगळीकडे गाजवतात. तुमचे आभूषणे ते तयार करतात. पण त्यांचीच पायमल्ली करून लाभणारे समाधान हे अत्यंत कुचकामी राहणार. हे कधी कळणार? जगात घमंड करावा असा एकच असणार जो सर्वाधिक शक्तिशाली, धनाने व प्रतिष्ठेने असणार. बाकी सर्व त्याच्या मागे. कारण मी माझ्या चार मित्रात व तितक्याच नातेवाईकांत मोठा असेल तर मोठा नाही. जगात ज्याची नोंद होणार नाही त्या नोंदविरहित परिघातला मी अतिसामान्य ठिपका. तोच ठिपका इतका भपका मारत असेल तर हे गर्व करावे इतके पर्व यायला जन्मोजन्मी मानव म्हणून जन्मावे लागेल तरीही तो कळस काही गाठता यायचा नाही.

कोणाकडे कितीही पैसा अन कितीही प्रतिष्ठा असो ती ज्याची त्याचीच असते. उगाच आपण मागे लागतो म्हणून कशातलेच चार आणे आपले होत नाहीत. कोणाकडे काही आहे म्हणून कोणी त्यांच्या मागे धावत पण नसते. माणूस चांगला तर जग चांगले. त्या चांगल्या गोष्टींचा चांगुलपणा सगळ्यांनी तो करावा आणि बाळगावाही. पण जेव्हा मीच मोठा व मोठा शहाणा होतो, तेव्हा गर्विष्ठपणा जन्म घेतो. नंतर तोच आपल्या अंताचे कारणही होतो. त्याच्या आधारे जीवन थोडे जगता येईल. यापुढे कोणी कितीही जवळ यावे म्हटले तरी ते आपल्याकडे सरकणार नाही अन तुम्ही तर इतके अहंमी होऊन गेलेले असणार की तुम्हाला कोणाला जवळ बोलावेही वाटणार नाही. माणूस बोलतो म्हणून माणूस नाहीतर तो जनावरच! पण हेच कौशल्ये आपण वापरत नसू तर मीठ नसलेले अन्न जसे तसे जीवन निरस होईल. अनेक आरोग्याच्या समस्येत मिठविरहित जेवण करावे लागते तसे बेचव जगणेही आपल्या घमेंडीमुळे येऊ शकते. सगळे निस्तेज दिसत असले तरी बदलणे तेव्हा आपल्या हाती राहत नाही. म्हणून जगताना जपून टाकलेले पाऊल कधीही चांगलेच.

बेहिशोबी संपत्ती जमवताना सहज आपण लोकांचे सोपे हिशोब चुकवतो. तेव्हा कोणाचा गळा किती दाबला अन कसा दाबला याची नोंद कुठेच राहत नाही. थोडक्यांना खुश करताना अनेकांना दुखवणे हे सहज होऊन जाते. जे अनेक अनेकांचे तारणहार असतात त्या अनेकांचे पाप आपल्याला लागत असते. मुळात पाप - पुण्य ते काय! ज्याची ना नोंद आहे ना हिशोब. लोकं म्हणतात व जनमानसात हिशोब होतो म्हणून ते परिमाप मांडायचे म्हणून मांडले. जसे कितीही श्रीमंत असो त्याला लोकशाहीत मत एकच गरिबसारखे तिथे लुटणारे व लुट होणारे, जगणारही तितकेच; चार दोन वर्षे मागे पुढे काय ते! सुखाची व्याख्या जर स्व- पुरतीच असेल तर निर्भेळ समाज व सात्विक प्रेम अस्तित्वात आले नसते. पण हव्यासापायी आपण ते जगणे व शोधणे सोडून दिले. सगळे असताना सगळ्याच बिमाऱ्या होत असतील तर ते सुख आपल्याला मिळाले नाही एवढेच कळते. प्रत्येकवेळी गळचेपी करणे, धांदली करणे, फसवणूक करणे सोडायला हवे. जो मला श्वास आहे तो त्याला मिळावा इतके खुले कधी तर व्हायला हवे. शेवट तर आहेच. शेवटी असो की आयुष्याच्या मधी तो चुकणार थोडा आहे. पुनर्जन्म तर कपोलकलपित आहे. जगायचे व खरे जगायचे एकदाच असताना नाही त्या भानगडीत पडण्याला काहीच अर्थ नाही.

किती जगलो
यापेक्षा कसा जगलो
हे महत्वाचे
जिथे सगळेच जाताहेत
तिथे काही करोडतले
तुम्हीही तितकेच

लेखक
**अमोल चंद्रशेखर भारती,**
**नांदेड**
**मो. ८८०६७२१२०६**

# महाराज बागेत २ तास खुली डुकरे

**नागपूर, १७ऑगस्ट :** १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान मी माझ्या मुलीला घेऊन महाराजबाग येथील प्राणी संग्रहालयाला भेट दिली. मच्छालयाला भेट देऊन पशुपक्षांकडे जात असताना रस्त्याशेजारी एक पांढऱ्या रंगाचा गावरान डुक्कर व त्याची तीन पिल्ले दिसली. त्याची माहिती स्थानिक गार्ड, महिला पोलीस व पोलीस कंट्रोलला दुपारी १२.३० च्या दरम्यान दिली. त्याचे फोटो व व्हिडिओ सुद्धा पाठविले. परंतु दुपारी २ वाजेपर्यंत त्या डुकरांचा शोध घेण्यात पोलीस व स्थानिक महाराजबाग प्रशासन नाकामी ठरले. आपले प्रशासन किती नाकर्ते आहे याचा प्रत्यय आला.



हे डुक्कर पाहताच माझी मुलगी घाबरली, अनेक मुलंही घाबरली, मी त्याचे फोटो काढून तिथल्या एका गार्ड ला हा डुक्कर येथे फिरणाऱ्या मुलांना वगैरे नुकसान पोहोचू शकतो असे सांगितले. त्यावर हे माझे काम नाही, मी पॉईंट सोडत नाही, तुम्ही कार्यालयात तक्रार करा, असे सांगितले. येथे चार महिला शिपायांचा ग्रुप येताना दिसला त्यांना थांबा मला तक्रार करायची आहे, असे म्हणताच त्यातील फक्त एक शिपाई थांबली, त्यांना हा प्रकार सांगितल्यावर त्यांनीही महाराज बागेच्या कार्यालयात जाऊन तक्रार करण्याचा सल्ला दिला.

नंतर मी पोलीस कंट्रोल रूमला फोन केल्यावर माझीच सविस्तर इन्क्वारी करत बसले. आणि डुकराचा तुम्हाला काय त्रास आहे? ते कुणाला चावत आहेत का? हे सुद्धा विचारले, मी स्थानिक नागपुरातील पोलीस कंट्रोलला फोन केल्यावर त्यांनी तिथे असलेल्या शिपायाला सांगण्याचे सुचविले, त्यानंतर त्यांनी संबंधितांना कळवतो असे बोलले, नंतर बर्डी पोलिसांचा फोन आला, तुम्ही कुठे आहात, डुक्कर कुठे आहेत? त्याचे फोटो व्हिडिओ, पाठवा अशी सूचना केली.

पुन्हा त्यांना मी दीड तासानंतर म्हणजेच २ वाजता त्या डुकराचे जिवंत व्हिडिओ व फोटो पाठविले. त्यानंतर पोलीस आणि महाराजबाग प्रशासनाचे गार्ड शोध मोहिमेवर निघाले. म्हणजे दीड तास पर्यंत हजारो लोक असलेल्या महाराज बागेत दीड तास पर्यंत डुकरांचा व त्यांच्या पिल्लाचा सर्रास वावर असतो. तोपर्यंत त्याचा प्रतिबंध केल्या जात नाही. किंवा त्यांचा प्रतिबंध करणारी यंत्रणा महाराज बागेकडे उपलब्ध नाही, जर ती डुकरे पिसाळलेली असती किंवा जर त्यांनी आपल्या पील्लयाच्या संरक्षणात हल्ले केले असते तर कित्येक मुलं जखमी झाली असती. जर एखाद्या वेळेस वाघ सुटला तर त्याचा बंदोबस्त करणारी यंत्रणा महाराज बागेकडे आहे काय? असा प्रश्न बसपा नेते उत्तम शेवडे यांनी प्रशासनाला विचारला आहे.


## आज का अंदाज

सोमवार १८ ऑगस्ट २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
**पत्थर फोड एकच**

**कल्याण बाजार**

| 2 | 3 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 147 | 120 | 790 | 450 |
| 390 | 229 | 880 | 559 |
| 200 | 300 | 600 | 667 |
| 21 | 31 | 60 | 90 |
| 24 | 34 | 65 | 95 |
| 27 | 37 | 68 | 98 |

**मुंबई बाजार**

| 2 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|
| 110 | 456 | 367 | 179 |
| 228 | 690 | 268 | 359 |
| 336 | 780 | 169 | 890 |
| 20 | 50 | 61 | 71 |
| 29 | 59 | 63 | 73 |
| 28 | 58 | 64 | 74 |

१८ ऑगस्ट २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 75 | 85 |
| 12 | 42 | 79 | 89 |
| 16 | 46 | 73 | 83 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
**प्रो. बालाजी कुमार**
**9822486034**


## राशीभविष्य

**मेष :** एखाद्या कायदेशीर प्रकरणात तुम्हाला अनुभवी व्यक्तीची मदत घ्यावी लागेल. तुमच्या वडिलांचे बोलणे तुम्हाला वाईट वाटू शकते, पण ते तुमच्यासाठी फायद्याचे असेल.

**वृषभ :** आज कामातील चुका सुधारून व्यवसायात वाढ करायची संधी मिळेल. तुमच्या जुन्या चुकांमधून शिका. जर तुम्ही कर्ज घेतले असेल, तर ते फेडण्याचा प्रयत्न कराल. पैसे वाढल्यामुळे खूप आनंदी असाल.

**मिथुन :** आजचा दिवस प्रगतीसाठी उत्तम असेल. तुमची काम करण्याची क्षमता चांगली राहील. कोणताही जुना आजार असेल, तर त्यात आराम मिळेल. मनासारखे काम मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** काम पूर्ण होईपर्यंत त्यावर चर्चा करू नका. कामाच्या ठिकाणी कामाचा ताण वाढू शकतो. तुम्ही सामाजिक कार्यक्रमांमध्ये भाग घ्याल, जिथे तुमची नवीन लोकांशी ओळख होईल.

**सिंह :** आज तुम्ही सकारात्मक विचार ठेवा. कारण तुमच्या चांगल्या विचारांमुळे तुम्ही तुमच्या शत्रूंवर मात करू शकता. तुम्हाला तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. तुम्ही लोकांचे भले कराल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा त्रासदायक असेल. नोकरीमुळे तुम्ही काळजीत असाल. तुम्हाला दुसरी नोकरीची ऑफर येऊ शकते, पण सध्याची नोकरी सोडू नका. पैसे वाचवण्यावर भर द्या.

**तूळ :** प्रवासाला जाताना तुमच्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्या. तुमची कामे उद्यावर ढकलू नका. दुसजयाच्या बोलण्यामुळे काम बिघडू शकते. राजकारणात मोठ्या नेत्याला भेटण्याची संधी मिळेल.

**वृश्चिक :** महत्त्वाची माहिती कोणासोबत शेअर करू नका. घर आणि बाहेरच्या कामांमध्ये समतोल ठेवा. नाहीतर घरातील लोक नाराज होऊ शकतात. तुमचे अडकलेले पैसे तुम्हाला परत मिळू शकतात.


**धनु :** आज तुमच्या खर्चाकडे लक्ष द्यावे लागेल. तज्ञाचा सल्ला घेतल्याशिवाय शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवू नका. मुलांच्या वागणुकीमुळे तुम्हाला काळजी वाटेल. भागीदार तुम्हाला धोका देऊ शकतो.

**मकर :** बचतीच्या योजनांमध्ये गुंतवणूक कराल. तुम्ही नवीन घर किंवा दुकान खरेदी करू शकता. तुमच्या शेजारच्या लोकांशी चांगले संबंध ठेवा. जर कोणाला पैसे दिले असतील, तर ते तुम्हाला परत मिळू शकतात.

**कुंभ :** आज मन थोडे अस्वस्थ असेल. कारण तुमच्या डोक्यात अनेक गोष्टी सुरू असतील. तुम्ही एखादी गोष्ट गुप्त ठेवली असेल, तर ती कुटुंबासमोर उघड होऊ शकते.

**मीन :** आजचा दिवस आनंदाचा असेल. तुम्ही नवीन घर घेऊ शकता, ज्यामुळे घरात आनंद राहील. तुमच्या जोडीदारासोबतचे संबंध चांगले होतील, पण तुमच्या बॉसला तुमचे बोलणे आवडणार नाही.

# शब्दकोडे क्रमांक २१९४



**आडवे शब्द :-**
१) आपले राष्ट्रीय गीत
५) स्त्री
६) अग्रलेख
१०) रक्तवाहिनी
११) तृण
१३) नवरदेव
१४) मादीच्या विरुद्ध
१६) निरुपयोगी
१८) मदन
२१) द्रव्य, धन
२२) विजार
२५) कडक व चिवट
२६) सारखा
२७) कमीशन, बट्टा
२८) प्राचीन
३०) पूर्ण बदल
३२) गाव
३४) गाढव
३५) एक चर्मवाद्य
३७) उपवासाला चालेणारा एक कंद
३८) मोठी वाटी
४०) शंकर
४१) च्या साठी
४३) वस्तरा
४५) खेकडा
४७) मवाळ धोरण
५०) जंगलाला लागलेली आग
५२) गंध
५४) राजा
५५) डाका
५७) थान
५९) खराब
६१) ममता, आपलेपणा
६३) नाश, प्रलय
६५) डोंगरातून आरपार गेलेला रस्ता
६७) एकूणएक, सर्व
६८) लाज
७०) ज्यास जहागीर मिळाली आहे असा
७५) साधारण
७६) पातळसर
७९) पाठविलेला
८१) साळी
८२) गज, वारण
८३) होडी
८४) न घाबरणारा

**उभे शब्द :-**
१) नमस्कार
२) रोग पसरविणारा किटक
३) निष्णात
४) सुसर
५) वार्ता
७) शुद्ध, पवित्र
८) प्रत्येक, भाव
९) उचित, योग्य
१२) खूण इशारा
१५) धपाटा
१७) मतलबापुरते नाते
१९) नूतन
२०) ताबडतोब
२१) कैफ, उन्माद
२३) मुसलमान
२४) धोका
२६) समतल
२७) लग्नासाठी जमलेली नात्यातील मंडळी
२९) माणूसघाणा, मत्सरी
३१) धडक
३३) मगज
३६) नष्ट, खाऊन संपविणे
३९) हवेतील थंडावा
४०) मिठाई तयार करणारा
४२) सिंह
४४) वाळवंट
४६) रातंबीचे साल
४८) पराग
४९) मुस्लीमांचा एक सण
५१) चौकशी
५३) सटवाई, दुष्ट स्त्री
५६) प्रत्येक दिवशी
५८) ** दमयंती
६०) उदबत्ती
६१) आंब्यातील द्रवपदार्थ
६२) माकड
६४) नवरा
६५) रेल्वेचा डबा
६६) मोठा भाऊ
६९) एकत्रित रडणे
७१) पराजय, माळ
७२) जिव्हा
७३) समईतील कापसाची गुंडाळी
७४) दुर्दशा
७५) अमृत
७७) आवाज, नाद, ध्वनी
७८) अस्वल
८०) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# समरसतेसाठी सामजिक सद्भावाची गरज :आ पठाण

**अकोला:** आपसातील मतभेद विसरून राष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी एकोप्याने राहण्याची आज आवश्यकता असल्याचे मनोगत आ साजिद खान पठाण यांनी व्यक्त केले.स्थानीय रेडक्रॉस सोसायटीत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात प्रमुख पाहुणे म्हणून आ साजिद खान पठाण बोलत होते.सर्वप्रथम आ पठाण यांच्या हस्ते राष्ट्रीयध्वज फडकविण्यात आला. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना आ साजिद खान पठाण यांनी समरसतेसाठी सामजिक सद्भावाची गरज असून यामुळे एकात्मता निर्माण होत असल्याचे सांगून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. यावेळी रेडक्रॉस चे चेअरमन डॉ किशोर मालोकार यांनीही उपस्थिताना संबोधित केले , याप्रसंगी आ पठाण यांचे सन्मानचिन्ह व शाल देऊन स्वागत करण्यात आले.तसेच रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थच्या नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ श्रध्दा अग्रवाल यांचा ही सत्कार करण्यात आला.




# पातुर तालुक्यात फॉगिंग मशीन बंद; आरोग्य व्यवस्था धोक्यात

## कोठारी गाव तापीच्या साथीने रडारवर – ग्रामस्थ भयभीत

**पातुर,दि १७ (प्रतिनिधी) :** पातुर तालुक्यातील कोठारी बुद्रुक व खुर्द येथे गेल्या दहा ते बारा दिवसांपासून तापीच्या साथीने गावकर्यांचे हाल होत असून प्रत्येक घरात कोणी ना कोणी आजारी असल्याची धक्कादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. लाखो रुपयांची फॉगिंग मशीन ग्रामपंचायतीकडे असूनही ती धुळ खात पडलेली आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



१६ ऑगस्ट २०२५ रोजी समाजसेवक अर्जुन टप्पे यांनी या गावाला भेट देऊन प्रत्यक्ष आढावा घेतला. त्यांनी रुग्णांची चौकशी करून आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी सांगितले की, ङ्गपातुर तालुक्यातील ग्रामपंचायतींना शासनाने फॉगिंग मशीन दिली आहेत. मात्र या मशीन केवळ शोभेच्या वस्तू ठरल्या असून गावांमध्ये फवारणी होत नाही. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल. असा इशारा अर्जुन टप्पे यांनी दिला आहे

गावातील अनेक नागरिक गेल्या काही दिवसांपासून तापामुळे त्रस्त आहेत. तुळशीदास रामदास टप्पे (वय ४०), सोहन जितेंद्र धाडसे (वय १४, रा. खानापूर), मंजुळाबाई हिवराळे (रा. पारडी), श्रवण टप्पे (वय ६२), भीमराव टप्पे, मारुती रामदास टप्पे, रामदास राजाराम टप्पे, मथुरा टप्पे, गोकर्ण टप्पे यांना उपचाराकरिता पातूरच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर शालिनी सुपाजी भुतकर (४५), सुपाजी देविदास भुतकर, आर्यन महेंद्र भुतकर (वय दीड वर्ष), रवींद्र माणिकराव सोयस्कार (३५), युग रवींद्र सोयस्कार (९), यमुना माणिक सोयस्कार (६५) हे दहा दिवसांपासून सलाईनवर उपचार घेत आहेत. या रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत खानापूर उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश लोखंडे यांनी माहिती दिली

# १७ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून पळवले; गुन्हा दाखल

**मुर्तिजापुर,दि १७(प्रतिनिधी) :** मुर्तिजापूर शहरात अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून फुस लावून पळवून नेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटने मुळे परिसरात खळबळ उडाली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.फिर्यादी सुमेध जामाजी इंगळे (व्यवसाय-बसचालक, महाराष्ट्र शासन, रा. निपाणा ता. जि. अकोला) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी अर्पिता (१७ वर्षे ११ महिने) ही मुर्तिजापूर येथील हेडज पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असून प्रतिकनगर परिसरात वास्तव्यास होती. रक्षाबंधनाचा कार्यक्रम आटोपून ती परत आपल्या रूमवर आल्यावर तिच्याशी संपर्क साधण्यासाठी मोबाईलवर फोन केला असता तो लागत नव्हता. त्यानंतर केलेल्या चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली.

पळसोबडे येथील विकी उर्फ सोनू विजय डोंगरे (वय २२ वर्ष) याने अर्पिताला लग्नाचे आमिष दाखवून फुस लावली आणि पळवून नेले असल्याचे समोर आले. घटनेची नोंद अप. क्र. ३९५/२०२५, कलम १३७(२) भा.न्या.संहिता अंतर्गत मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

घटना १२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास घडली असून १५ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा याबाबत पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास प्र. उपनिरीक्षक नितीन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून अंमलदार शालिनी सोळंके तपास करीत आहेत.या घटनेमुळे शहरात संतापाचे वातावरण असून अल्पवयीन मुलींना लग्नाचे आमिष दाखवून फसविण्याच्या घटनांवर आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# लाखपुरी सह लाखपुरी सर्कल मध्ये झालेल्या पावसामुळे हजारो हेक्टर शेती पिकांचे नुकसान

## पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे ४ तास वाहतूक बंद होती



**लाखपुरी,दि १७ (प्रतिनिधी) :** मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी सह लाखपुरी सर्कल अनेक भागात अवकाळी पाऊसामुळे दि. १६ ला झालेल्या पाऊसामुळे कापुस , तुर ,सोयाबीन पिकांचे मोठ्याप्रमाणात अतोनात नुकसाना झाले . हजारो हेक्टर शेतीच्या पिकांचे नुकसान झाले . लाखपुरी व लाखपुरी सर्कल मधील अनेक ठिकाणी घरांचे सुध्दा पडझड झाली आहे . ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्यामुळे मुर्तीजापूर दर्यापूर मार्गावरील लाखपुरी पायटांगी च्या वनमाला नाल्याचा मोठा पूर आल्यामुळे पुलाच्या वरून पाणी वाहू लागले आणि वाहतूक ठप्प होऊन संपर्क तुटला सदर वाहतूक जवळपास चार तास ठप्प राहिल्याने दोन्ही बाजूला शेकडो वाहनाच्या लांबच लाब रांगा लागल्या होत्या परंतु काही वाहन धारक पुराच्या पाण्यातून वाहने काढण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे पोलिसांना प्रचारण करण्यात आले ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार तसेच त्यांचे सहकारी सह या ठिकाणी येऊन परिस्थिती हाताळली या ठिकाणी ओमनी गाडीच्या पुरात वाहून जाताना थोडक्यात बचावली व उपविभागीय अधिकारी संदीप अपार त्यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार शिल्पा बोबडे , ठाणेदार गुट्टे साहेब,तलाठी विरेंद्र वानखडे , महसूल अधिकारी , कृषी विभागाचे अधिकारी पत्रकार बांधव , तंटामुक्ती अध्यक्ष उपस्थित होते या ठिकाणी भेट देऊन पाहनी केली. लाखपुरी शिवारातील काही शेतातील कपासी व सोयाबानी व तुरी चे झाडे अक्षरशा खाली पडले तर कपासी सोयाबीन पिकांचे अतोनात नुकसान झाले.

# हिवरखेड येथे कृष्णजन्मोत्सव तथा दहिहांडी उत्साहात संपन्न

**हिवरखेड,दि १७(प्रतिनिधी) :** चंडीका चौक झाडीपुरा येथे झाडे कूनबी समाजात कृष्णजन्मोत्सव सनातन रुढी प्रमाने यांचे घरोघरी आरास करून लाईटींग डेकोरेशन लावून सजविन्यात येते तर हा जन्मोत्सवात स्त्रिया बारा वाजेपर्यत जागरण करत कृष्ण जन्माचे स्वागत करतात भजन पुजन जागरण सह घरोघरी हा साजरा करन्यात येतो रात्री बारापर्यंत गावकरी दर्शनाला घरोघरी भेट देत कृष्णदर्शनाला गर्दी करतात तसेच दुसरे दिवशी दहीहांडीला घरोघरी महाप्रसाद होते या नतर सध्याकाळी सामूहीक दहिंहाडी चा कार्यक्रम गावातील मोठामहादेव सस्थांन, चंडीका चौक आसरा माता मंदीर येंथे मानवी थर लावुन गोवींदा आलारे च्या तालावर गोपालकाला मटकी फोडन्यात आली चंडींकाचौकात सर्वात ऊंच मच मटकी लावली होती गोंवींदा नाचताना त्याच्यांवर पान्याचा वर्षाव करण्यात येतो.



# संस्था नेहमी सुखदु:खात सहभागी असतेच : स्नेहप्रभादेवी गहिलोत

**पातुर, दि १७ (प्रतिनिधी) :** तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथे नुकताच सेवानिवृत्तीचा कार्यक्रम घेण्यात आला 'संस्था नेहमीच कर्मचाऱ्यांच्या सुखदुः खात सहभागी असतेच असे प्रतिपादन निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी सौ स्नेह प्रभादेवी गहिलोत सचिव, बेरार एज्युकेशन सोसायटी पातुर यांनी केले.

सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापिका सौ आर एस ढेंगे यांनी केले. तुळसाबाई कावल विद्यालय बाभुळगाव येथील प्राचार्य एस बी ठाकरे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले त्यांनी वयाची ३१ वर्ष संस्थेमध्ये सेवा दिली प्राध्यापक म्हणून नियुक्त झालेले श्री एस बी ठाकरे हे उपप्राचार्य ते प्राचार्य अशा प्रकारचा त्यांचा



संस्थेमधील शैक्षणिक क्षेत्रातला प्रवास केला. इंग्रजी विषयाचे ज्ञान देत त्यांनी मुलांना घडविण्याचा प्रयत्न केला. श्री एस बी ठाकरे यांनी कनिष्ठ महाविद्यालयात येऊन, गेली अनेक वर्षे, अत्यंत निष्ठेने आणि समर्पितपणे काम केले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले, त्यांचे भविष्य घडवले आणि त्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यांनी केलेले कार्य, त्यांचे शिकवण्याचे अनोखे तंत्र, आणि विद्यार्थ्यांशी त्यांचे असलेले नाते, हे नेहमीच स्मरणात राहील. त्यांचे प्रेम, त्यांची आपुलकी, आणि त्यांचा उत्साह, यामुळे शाळेचे वातावरण नेहमीच सकारात्मक राहिले असे मनोगत व्यक्त करताना प्रा. डॉ. इ. एस सुर्वे यांनी केले. हीच सकारात्मक भावना येणाऱ्या काळात पुढील शिक्षकांनी संस्थे प्रती ठेवावी अशी इच्छा सेवानिवृत्त प्राचार्य एस बी ठाकरे यांनी स्वागताचे प्रत्युत्तर देत असताना बोलवून दाखवली.

संस्थेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री एस बी बोंडे यांनी वयाची ३५ वर्ष संस्थेमध्ये सेवा दिलेली आहे. अतिशय शांत,संयमी स्वभावाचे व्यक्तिमत्व म्हणजे सुधीर भाऊ बोंडे म्हणून विद्यालयात प्रसिद्ध आहेत. सांगितलेले काम कधीही न कंटाळता पूर्णत्वास कशाप्रकारे नेता येईल याची सचोटी त्यांच्या कार्यात नेहमीच बघायला मिळाली.

# हिवरखेड येथील युवकांचा राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये भव्य प्रवेश

**हिवरखेड,दि १७ (प्रतिनिधी) :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजित दादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व पक्षाच्या विचारधारेला अनुसरून हिवरखेड तालुका तेल्हारा येथील असंख्य युवकांनी मा.आ. अमोल दादा मिटकरी प्रवक्ता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीमध्ये प्रवेश घेतला. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा यांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या हस्ते, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तेल्हारा तालुका अध्यक्ष श्री सुरेश भाऊ ओंकारे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, व अकोला जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा पदाधिकारी बरकत उल्ला खान, श्री भटकर, श्री आकाश रेखाते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हिवरखेड येथील युवा नेता मोहम्मद फैजान यांच्या वतीने हा पक्ष सोहळा घेण्यात आला यावेळी अल्पसंख्यांक समाजासाठी मा. ना. अजित दादा यांचे कार्य व पक्षाची विचारधारा संबंधितांना जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा त्यांनी अवगत केली. व




अल्पसंख्यांक समाजाने कुठलीही भीती न बाळगता किंवा कुठल्याही दडपणाखाली न येता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मध्ये समाविष्ट व्हावे असे आवाहन केले. यावेळी डॉ. युसुफ खान, माजी नगरसेवक मोहम्मद नुरुजमा, शाहरुख लाला, रशीद भाई त्यांच्यासह हिवरखेड येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# विभीषिका स्मृती दिन साजरा

**अकोला :** आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत शाळांमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम राबवण्याचा महाराष्ट्र शासनाचा आदेश प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने आज दिनांक १४ ऑगस्ट २०२५ ला श्री दलपत नाईक प्राथमिक, माध्यमिक तथा बाबासाहेब नाईक उच्च माध्यमिक आश्रम शाळा गावंडगाव येथे प्राचार्य, श्री सुरेश बा. चव्हाण सर यांच्या हस्ते आश्रमशाळेत ध्वजारोहण करण्यात आले.

# खदान येथे स्वातंत्र्य दिवस मोठ्या आनंद उत्साहात साजरा

**अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :** खदान येथील ईदगाह येथील पटांगणात स्वातंत्र्य दिवस मोठ्या आनंद उत्साहात साजरा करण्यात आला. अकोल्याचे मा. उपमहापौर तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे महानगर अध्यक्ष मो. रफीक सिद्दिकी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळेस मौलवी सैय्यद वसीउल्ला साहब, माजी नगरसेवक इर्शाद हुसेन, शिक्षणाधिकारी मनपा हरिचंद्र इटकर, मुख्याध्यापक मोहम्मद एजाज, मुख्याध्यापक फैसल अन्सारी, मुख्याध्यापक अजहर, हाजी मोहम्मद जाफर सिद्दिकी उर्दू ज्यु.कालेज खदान, ख्वाजा अजमेरी उर्दू हायस्कूल खदान, जि.प. उर्दू प्राथमीक शाळा खदान, हाजी मोहम्मद जाफर सिद्दिकी उर्दू प्राथमिक शाळा क्र. ९ व शिक्षक, कर्मचारी व तिनही शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दिंड्यांच्या महासोहळ्यात श्री ज्ञानेश जयंती अभूतपूर्व साजरी

## नि.प.च्या आवाहनाला सर्व स्तरातून प्रतिसाद विद्यार्थ्यांनी साकारल्या संतांच्या वेशभूषा





**अकोट,दि १७ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात गोकुळअष्टमीला विश्वमाऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची यांची सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ७५० वी जयंती आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक उपक्रमांद्वारे संत नगरी आकोटमध्ये भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली.

नगर परिषद, आकोट व श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावण कृष्ण अष्टमी या तिथीवर शहरामध्ये गावोगावच्या दिंड्यांचा महासोहळा लक्षणीय ठरला. स्थानिक श्री संत नरसिंह महाराज समाधी मंदिर येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे व पादुकांचे विधिवत पूजन मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे, श्री नरसिंह महाराज संस्थानचे अध्यक्ष सतीश आसरकर, श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष श्री वासुदेवराव महाराज महल्ले यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. तद्नंतर श्री माऊलींची प्रतिमा व पादुका रथामध्ये विराजमान झाल्या आणि भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला.

पालखी सोहळ्यामध्ये पताकधारी, अब्दागिरीधारी, टाळकरी, विणेकरी, मृदंगाचार्य, माऊलींचा अश्व व पालखी रथ अशा राजभैभवी थाटात हा पालखी सोहळा मार्गस्थ झाला. यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, आकोटचे एन. सी. सी. पथक, एन. एस. एस. पथक, विद्यार्थी प्राचार्य डॉक्टर सुनील पांडे व प्राध्यापक मंडळी, श्री शिवाजी विद्यालय, आकोटचे विद्यार्थी, मुख्याध्यापक संजय वालसिंगे व शिक्षक मंडळी, श्री शिवाजी विद्यालय आसेगाव बाजारचे मुख्याध्यापक अनंत कुलट, श्री शिवाजी विद्यालय, कुटासाचे पर्यवेक्षक राजेश सावरकर, श्री भाऊसाहेब पोटे विद्यालय, लालबहादूर शास्त्री कॉन्व्हेंट येथील विद्यार्थी सहभागी होती. यांसोबतच अनेक विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत सोपान काका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत चांगदेव महाराज, जगद्गुरु संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, आदी वेशभूषा साकारल्या होत्या. त्याचप्रमाणे देशभक्तीपर देखावे, वेशभूषा सुद्धा करण्यात आल्या होत्या. दिंडी सोहळ्यातील ह्या वेशभूषा महत्त्वपूर्ण आकर्षण ठरल्या. पालखी मार्गाने टाळ मृदंगाच्या गजरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पावल्या, फुगड्या, जयघोष असा आनंद लुटला. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या गजराने संत नगरी आकोट अवघी दुमदुमली होती.

पालखी मार्गाने श्री संत नरसिंह महाराज मंदिर, गवळीपुरा चौक, श्री संत वासुदेव महाराज निवासस्थान, पोलीस स्टेशन, छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक, नगरपरिषद मुख्यालय, सोनू चौक, जयस्तंभ चौक, याकूब पटेल चौक, शौकत अली चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, पान अटाई, बापू बळीराम चौक, महात्मा फुले चौक, नंदिपेठ, या पालखी मार्गाने शहरातील माजी नगरसेवक, विविध संस्थेचे व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, पालखी रथाचे मनोभावे पूजन, पुष्पवृष्टी, चहा, फराळ वाटप करून मनोभावे स्वागत केले.

# दे दी हमे आजादी बिना खडग बिना ढाल, यापेक्षा मोठा धोका नाही : सुनील देवधर



**अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :** संस्कृती संवर्धन समिती, अकोला यांच्या वतीने आयोजित अखंड भारत संकल्प दिनानिमित्त जाहीर व्याख्यानाचे आयोजन गुरुवारी खंडेलवाल भवन, अकोला येथे करण्यात आले होते. मंचावर प्रमुख वक्ते सुनील देवधर, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश संतानी, समिती अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, स्वागत समिती अध्यक्ष अरविंद देठे उपस्थित होते.

ङ्गअखंड भारत - संकल्प ते साकारङ्ग या विषयावर प्रमुख वक्ते सुनील देवधर (राष्ट्रीय संयोजक - पूर्वोत्तर भारत संपर्क प्रकोष्ठा व माजी राष्ट्रीय संयोजक, भारतीय जनता पक्ष) यांनी आपल्या भाषणात बिना आजादी, बिना ढाल। बिना आजादी बिना ढाल मिळाले स्वातंत्र्य, भगत सिंघ, राजगुरू, सुखदेव, चाफेकर बंधु, लोकमान्य टिळक, योगी अरविंद, रामप्रसाद बिस्मिल, चंद्रशेखर आझाद, अल्लूरी सीताराम राजू, या सारख्या असंख्य क्रांतिकारकांनी शस्त्र उचलले त्यांचं योगदान नाही?. दे दी हमे आजादी बिना खडग बिना ढाल, याच्यापेक्षा मोठं चूप, याच्यापेक्षा मोठा धोका कोणता असू शकत नाही. त्यांच्या योगदानाच्या बद्दल प्रश्न नाहीये. फक्त त्यांच्यामुळे आझादी मिळाली हे धादांत असत्य आहे. हे अर्धसत्य आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# हिंगणा तालुक्यात स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष

**महासागर प्रतिनिधी,**
**हिंगणा, दि. १७ :**

हिंगणा तालुक्यातील प्रत्येक भागात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रॉयल गायत्री पार्क टू, सौदामिनी चौक, ग्रीन पार्क सोसायटी, बंजारा माता नगर, बाबडे लेआउट व वाघधरा येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्वक साजरा करण्यात आला. या प्रसंगी स्वातंत्र्य सेनानी स्व. दामोदर भगवान दैवलकर यांच्या त्याग व महान कार्याची आठवण काढून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार तसेच शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# आम आदमी पार्टी गणेशपेठ द्वारा स्वतंत्रता दिवस साजरा

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १६ :**

आम आदमी पार्टी नागपूर तर्फे ७९ व्या स्वातंत्र्य दिवस सोहळा निमित्त ध्वजारोहण कार्यक्रम आम आदमी पार्टी -मुख्य कार्यालय गणेशपेठ , येथे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. यावेळी भूषण ढाकुलकर (महाराष्ट्र संघटन सचिव), डॉ शाहिद अली जाफरी , सोनु फटींग, सुषमा कांबळे,डॉ अमेय नारनवरे , रोशन डोंगरे , प्रदीप पौनीकर,सचिन लोणकर, प्रशांत मेश्राम, जावेद अहमद, श्रीकांत कामंडी, अल्का पोपटकर,विपीन कुर्वे,विनोद गौर, निलम नारनवरे, संगीता बाथो,संजय बारापात्रे,मंजूषा पोपरे,चेतन निखारे, तेजराम शाहू,रिता तिवारी उपस्थित होते.



# बेलतरोडी येथील साई नगरी येथे स्वतंत्रता दिवस साजरा

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

बेलतरोडी परिसरातील नागरिक एकत्र येऊन साईनगर मैदानावर स्वतंत्रता दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी झेंडा वंदन माजी सैनिक प्रेम राज अहेर तसेच पोलिस उपनिरीक्षक आठवले याचे तर्फे करण्यात आले.

लेंडे आणि जोशी यांनी विविध समस्यांवर चर्चा केली, तसेच संजय जवादे प्रभाग मित्र यांनी प्रभागाचे विकास करण्याकरिता नागरिकांना एकत्रित येण्याचे आवाहन केले. सर्व साई नगरातील नागरिक स्वतंत्रता दिवस साजरा करण्यात सहभागी झाले त्यात अमित तीमांदे, चोपडे , संजय चट्टे , राजेश इंगळे, वंजारी आणि महिला मंडळ यांनी सहभाग दाखविला.



# सेंटर पॉईट शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

वर्धमान नगर येथील सेंटर पॉईट शाळेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या कांचन उके यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सलामी देण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्या उके म्हणाल्या स्वातंत्र्य म्हणजे केवळ स्वतंत्र राहणे नव्हे, तर समाजात एकोप्याने व गुण्यागोविंदाने राहणे होय.

प्रत्येकाने समाजासाठी काहीतरी सकारात्मक योगदान देणे, हेच खरी स्वातंत्र्याची जाणीव आहे.स्वातंत्र्य समता बंधूभाव या मूल्यांशी निष्ठावान राहायला आणि विद्यार्थ्यांना मोठी स्वप्न पाहण्याचा आणि कठोर परिश्रम करण्याचा संदेश दिला.



कार्यक्रमात अभिज्ञान अग्रवाल आणि हर्षित पेरिवाल या विद्यार्थ्यांचा विशेष कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती आणि जयती चक्रवर्ती यांच्या हस्ते सुरक्षा रक्षकांचा सत्कार करून त्यांचे योगदान गौरविण्यात आले.

वाईस कॅप्टन ब्रिजेश पुण्यानी यांनी विद्यार्थ्यांना देशभक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि सहकार्य यांचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य, नाटिका, सेनचर्चा सादर केली. विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थी आणि पालकांची वेशभूषा सादरीकरण आणि घोषवाक्यांची प्रस्तुती. यामध्ये भारतमातेपासून ते ऐतिहासिक थोर व्यक्तिमत्त्वां पर्यंत अनेक भूमिकांचे सजीव दर्शन घडविण्यात आले. भारत माता,शिवाजी महाराज, जिजाबाई, लक्ष्मीबाई, दामोदर, नेताजी सुभाषचंद्र बोस, सावित्रीबाई फुले, ज्योतिबा फुले,भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, वल्लभभाई पटेल, अहिल्यादेवी होळकर, सरोजनी नायडू, सिंधुताई सपकाळ अशा अनेक क्रांतीकारकांची आणि राष्ट्रनेत्यांची प्रभावी रूपे साकारण्यात आली.

चित्रकला शिक्षक राजेश तेलरांधे, प्रियंका कुंभारे आणि उमेश गिरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पालकांनी लाल किल्ला आणि तिरंगा यांच्या चित्रांना रंग भरले. कार्यक्रमाचे संचालन आर्या कुंभारे, गीत शाहू आणि कल्प जैन यांनी समर्थपणे पार पाडले. समारोपात कभी ना झुकने पाए ये शान का झंडा आणि कदम कदम बढ़ाए जा या देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रमाची सांगता केली.

# बालसदन येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त वृक्षारोपण

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बाल सदन येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी बालसदनचे मुख्य कार्यकारी अधिकारी , मुकेश कोल्हे, प्रदीप सर, नयन संस्था संचालक नरेश चोपकर, बाल सदन येथील सर्व बालक विद्यार्थी तसेच नयन बहुउद्देशीय महिला विकास संस्था, सेमिनरी हिल्स नागपूर सचिव नमिता चोपकर व मयुरी कोल्हे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



# राष्ट्रमाता कस्तुरबा ग्रंथालयात ध्वजारोहण

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

प्रभाग १४, सदर गांधी चौकातील राष्ट्रमाता कस्तुरबा ग्रंथालयात सकाळी ९ वाजता गणमान्य योगेश तिवारी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. राष्ट्रगीताने राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली.

यावेळी ग्रंथालय कर्मचारी रीबेका सॅमुवेल, जयश्री चौहान, किशोर सिरसवार, मोहित वासनिक, अभ्यासिका कक्षाचे विद्यार्थी, सदर वस्तीचे प्रतिष्ठित नागरिक, गणमान्य अरविंद शिवहारे, अज्जू तिहारे, अरुण लांडगे, दिनेश कटारिया नकाऊ , क्लॉडियस पीटर आणि इतर नागरिक उपस्थित होते. ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.त्यानंतर ग्रंथालय कर्मचाऱ्यांकडून अल्पोपहार दिला गेला ज्याचा सर्वांनी आनंद घेतला.



## जामदार वाडी उद्यानात स्वातंत्र्यदिन उत्साहात

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :** प्रभाग क्रमांक ५ जामदार वाडी येथे ७९वा स्वतंत्रतादिन वस्तीतील प्रतिष्ठित नागरिक उमाटे यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. ह्या कार्यक्रमात सुरेश दुर्गे, कमलाकर बोकडे, घनश्याम निखारे,नंदू लायसे, कावळे, रविंद्र बोकडे यांची प्रमुख उपस्थित होती तर यावेळी अनिल संभे, शंकर मनगटे,श्याम पोकळे, सोनुसाव, रामा पराते, कृष्णा माकोडे, प्रशांत धुळे,पवन चकोले, निर्मला संभे, संगीता माकोडे, अनिता संभे, रिंकुजी सोरते, मंजू माकडे यांचे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम लाभले.



# रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय रामटेक येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १७ :**

रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्ष मा. रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. यावेळी सर्वांनी राष्ट्रगीत गाऊन देशभक्तीची भावना प्रकट केली.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषण व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण भारावून टाकले. विभागप्रमुख प्रा. चेतना उके यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, राष्ट्रीय ऐक्य व जबाबदारी याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच, प्रा. कला मेश्राम, प्रा. उर्मिला नाईक, प्रा. निकिता अंबादे, प्रा. ज्ञानेश्वर नेवारे, प्रा. अमित हटवार, प्रा. विलास मडावी, प्रा. आकाश मोहबिया, प्रा. शैलेंद्र वासनिक, प्रा. अनिल मिरासे, राजेंद्र मोहनकर व संदीप ठाकरे यांनीही विद्यार्थ्यांना देशभक्ती व सामाजिक जबाबदारीचे मूल्य पटवून दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी ङ्गजय हिंदङ्घ चा जयघोष करून कार्यक्रमाची सांगता केली.

# नगरपरिषद वानाडोगरी येथे झेंडावंदन साजरा



**महासागर प्रतिनिधी,**
**हिंगणा, दि. १७ :**

हिंगणा, नगरपरिषद वानाडोगरी येथे झेंडावंदन मोठ्या उत्साह मध्ये साजरा करण्यात आला माननीय मुख्याधिकारी राहुल परिहार यांच्या हस्ते झेंडावंद करण्यात आले याप्रसंगी कार्यक्रम घरघर तिरंगा व संत ज्येष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज सुवर्ण महोत्सवी ७५० जयंती वर्षानिमित्त पालखी सोहळा व वृक्ष दिंडी काढण्यात आली नगरपरिषद पासून ते साई मंदिरापर्यंत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी फिरवण्यात आली याप्रसंगी उपस्थित माननीय माजी नगराध्यक्षा सौ वर्षाताई शहाकार माजी सभापती सौ वंदना मुडे नितीन काळे अनिता गुप्ता माजी नगरसेविका महानंदाताई पाटील गुणवंत मते सुलोचना ताई झाडे माजी गटनेता बालू मोरे शहराध्यक्ष राजेंद्र जी लोहकरे मंडल अध्यक्ष सचिन मेंडजोगे माजी सरपंच सतीश भाऊ शहाकार मानव अधिकार जिल्हाध्यक्ष दादाराव मुडे सामाजिक कार्यकर्ते गजानन झाडे मनोज राऊत आशिष अजमेरे प्रकाश डाखळे माजी उपाध्यक्ष कृपाशंकर गुप्ता माजी सभापती शुभम गोहाड संतोष कुभरे व कर्मचारी वर्ग व गावातील नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

## आदिवासी समाजातील गरजू विद्यार्थ्यांना स्कूल ड्रेस व टीशर्ट चे वाटप आज

**नागपूर, दि. १७ :** हलबा बहुल भागातील आणि नागपूरच्या जुन्या वस्तीतील २०५ गरीब व गरजू विद्यार्थ्यांना आदिम संशोधन अध्ययन मंडळ व अस्तित्व क्रिएशन आणि एज्युकेशन एम्पॉवरमेंट अंडर प्रीव्हीलीजीयस गर्ल्स फाउंडेशन नागपूर यांच्यावतीने आज १७ ऑगस्टला सकाळी ११.३० वाजता स्कूल ड्रेस व टी-शर्टचे वितरण होणार आहे. स्कूल ड्रेस व टी-शर्ट चे वाटप हनुमान मंदिर, नाईक तलाव रोड, पिवळी मारबत, दहनभूमी चौक तांडापेठ नागपूर येथे करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला स्टेट बँक हलबा कर्मचारी मंडळ व सेंट्रल बँक आदिम हलबा कर्मचारी संघटना यांचे सौजन्य लाभले आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



एनर्जेटिक फिटनेस जिमद्वारा स्वातंत्र्य दिनाला जल्लोष व एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या

# कामठी येथे स्वातंत्र्यदिन साजरा

**महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १६ :** दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही १५ ऑगस्ट २०२५ रोजी, भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन शहर काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्री. रमेश जी दुबे यांच्या हस्ते गांधी मंच, गांधी चौक येथे ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे, कामठी शहर सेवा दलाचे अध्यक्ष नितेश यादव यांच्या हस्ते शहर काँग्रेस समिती कार्यालय, गांधी भवन, कामठी येथे ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री. प्रसन्ना (राजभाऊ) तिडके, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री. शकूर भाई नागानी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री. अवंतिकाताई लेकुरवाळे , कामठी नगरपरिषदेच्या माजी अध्यक्ष श्री. शाहजहान भाई, कामठी नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष श्री. रतनलाल जी बरबटे, माजी शहरप्रमुख श्री. निरज यादव, कामठी नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष श्री. नीरजजी यादव, कामठी नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष प्रमोद मानवटकर, कामठी नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. अहफाज अहमद, शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आणि कार्यालय प्रभारी श्री. लक्ष्मण संगेवार, महाराष्ट्र राज्य कॉंग्रेस सेवादल सचिव श्री. राजकुमार गेडाम, महिला अध्यक्षा सुरैया बानो, शशिकला देशमुख, शाहीन शेख, माजी अध्यक्ष शहर काँग्रेस कमिटी श्री. कृष्णा यादव, इर्शाद शेख, कॅन्टोन्मेंट बोर्ड कामठीचे माजी उपाध्यक्ष युगचंद छल्लानी, माजी नगरसेवक आसिफ सरमर्तीया, उबेद अफरोज, अमीन रशिदी, प्रमोद खोब्रागडे, राजेश कांबळे, माजी नगरसेविका ममता कांबळे, मो.अर्शद माजी नगरसेवक, तौसिफ फैजी, तौसिफ खान, वसंत बोलगुंडेवार, कुसुमताई खोब्रागडे, आनंद खोब्रागडे, मो. अकरम, राजकुमार भगत , राजकुमार भगत, मो. भाई, फैजल नागानी, संदीप जैन, राजमणी तालेवार, अब्दुल सलाम, रफिक खान, डॉ.सुनील वाघमारे सेवादल सचिव नागपूर जिल्हा, प्रकाश लाइनपांडे, विपीन गायकवाड, हेमंत काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**महासागर प्रभाग वार्ता**

# मेहंदीबाग टी-पॉइंटवरील ट्रॅफिक सिग्नल बंद

## नागरिक वाहतूक कोंडीमुळे त्रस्त



**प्रमोद जांभुळकर,**
**नागपूर दि. १६**

सदरस्थित मेहंदीबाग टी-पॉइंट येथील ट्राफिक सिग्नल गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. या भागात दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते, मात्र सिग्नल बंद असल्यामुळे वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून अपघाताची शक्यताही वाढली आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यावर लक्ष वेधले आहे. राकेश गायकवाड, सुजत कुंभळकर, शैलेंद्र रामटेके, प्रकाश कोटांगळे आणि वीरेंद्र लाउतकर या नागरिकांनी वाहतूक विभागाकडे तातडीने ट्राफिक लाईट दुरुस्त करून सुरु करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेकदा शाळा आणि ऑफिसच्या वेळेत या ठिकाणी प्रचंड जाम होतो, त्यामुळे नागरिकांचा वेळ वाया जातो आणि त्रास सहन करावा लागतो. तात्काळ उपाययोजना न झाल्यास मोठ्या स्वरूपाची वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते.वाहतूक विभागाने या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित यंत्रणा लवकरात लवकर कार्यान्वित करावी, अशी मागणी आता परिसरातील नागरिक जोरदारपणे करत आहेत.

# वाहतुकीला अडथळा ठरतोय मातीचा ढिगारा -अपघाताचा धोका



**प्रमोद जांभुळकर,**
**नागपूर दि.१६**

उत्तर नागपूरमधील प्रभाग क्रमांक ७ इंदोरा येथील सखाराम मेश्राम चौकात म.न.पा. विभागाने केलेल्या कामानंतर खड्डा तात्पुरत्या स्वरूपात भरून मातीचा ढिगारा तसेच सोडून दिला आहे. परिणामी, या ठिकाणी वाहतुकीला गंभीर अडचणी निर्माण झाल्या असून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

सदर चौक हा महामार्गावर असून दररोज मोठ्या प्रमाणात जड वाहनांची वर्दळ असते. मातीचा ढिगारा झेब्रा क्रॉसिंगच्या अगदी जवळ असल्याने पादचाऱ्यांना सुद्धा रस्ता ओलांडताना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.स्थानिक नागरिक बंडू साखरे, भूपेश सहारे, मंगेश नागबौद्ध, मुकेश भोतमांगे, प्रवीण पाटील, सुबोध आंबेकर यांनी पालिका प्रशासनाचा निषेध व्यक्त करत तातडीने मातीचा ढिगारा हटवण्याची मागणी केली आहे.

